
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ४६.

REFBK-0002706

ग्रं. सं. ठाणे
निबंध
४६

# पाडव्याची भेट



REFBK-0002706

# गृहस्थाश्रम

—:0 ◇ 0:—

लेखक व प्रकाशक:—

**गोविंद रंगराव अळेकर.**

नवी शुक्रवारी, नागपूर.

---


**चैत्र शुद्ध १ शके १८४७ संवत १९८१**

**रोज बुधवार तारीख २५ मार्च १९२५.**

---

**किंमत चार आणे.**

॥ श्री ॥



## प्रस्तावना.

सूज्ञ मंडळींनीं मधुर हास्य करून वरचेवर प्रोत्साहन दिलें ह्मणूनच आजपर्यंत नऊ लेख लिहिले गेले आणि आज दहावा लेख लिहिण्याचा सुप्रसंग आलेला पाहून मनाला किती तरी आनंद होत आहे ! गतवर्षी " गृह आणि गृहस्थ " ह्या विषयावर जो लेख लिहिला त्या लेखाचीं सूज्ञ मंडळींनीं जी संभावना केली ती संभावना आणि कसोटीला लावणारी टीकाकारांची टीका उत्साह वाढविणारी असल्यामुळें मनाला इतका उत्साह वाटला कीं त्यायोगें मध्यंतरीं जीं संकटें आलीं त्या संकटांतहि मन गोंधळून न जातां जन्म, मृत्यु, लाभ

आणि हानि ह्या चार गोष्टी तर मनुष्याच्या स्वाधीन नसून मनुष्यापेक्षां श्रेष्ठ असलेल्या अशा शक्तीच्या स्वाधीन आहेत ह्याचीहि पूर्णपणें खात्री पटली. जेथें आनंद आहे तेथें जोडीला दुःखहि आहेच ह्मणून आनंद कोठें आहे हें समजलें आणि दुःख होत असतांना थोडेसेंहि बरें वाटलें की आनंदच होतो आणि जगांत कर्म योगच श्रेष्ठ असल्यामुळें कर्म करण्याकडे- सच प्रवृत्ति होते आणि सूज्ञ मंडळींनी प्रोत्साहन दिलें ह्मणजे जगांत वावरतांना भीति वाटण्याचें कारण सुद्धां राहत नाहीं हेंहि पटलें. आजपर्यंत प्रत्येक लेखांत जे विचार सांगितले ते विचार सांगतांना कांहीं ठिकाणीं अंतर पडल्यामुळें जरी तसें सांगतांना नाविन्य दिसलं तरी जगाच्या वाढी बरोबरच त्यांच्या पूर्वीच्या वर्णनांत आणि आतां असणाऱ्या स्वरुपांत वाढीमुळें अंतरच राहणार ह्याची जाणीव असल्यामुळें चक्षुर्वैसत्यं जसें आतां दिसतें आणि अनुभवास येतें तसेंच तें सांगि- तलें. असें सांगत असतांना कांहीं ठिकाणीं कल्पनाहि सांगाव्या लागल्या. जें दिसतें तें कधीं कधीं जरी जसें दिसतें तसें नसतें तरी जसें दिसतें तसें कधीं

कधीं असतेंहि हें सुद्धां अनुभवास येत असल्यामुळें हातांत प्रत्यक्ष दिसणाऱ्या रुपयाला तो रुपया नाहीं असें म्हणून कसें चालेल ? ज्यांच्या डोळ्यांना कावीळ झालेली आहे त्यांना पांढरें सुद्धां पिवळेंच दिसतें ह्मणून ज्यांना पांढरें आणि पिवळें हें दोन्हीहि रंग दिसतात त्यांना कावीळ झालेली आहे असें कसें म्हणतां येईल ? एखाद्या विचारा संबंधानें असलेली एक कल्पना पूर्णपणें सत्य आहे असें ठरे तोंपर्यंत त्या विचारा संबंधानें असलेली दुसरी कल्पनाहि विचारांत घेण्यास कोणती हरकत ? आणि जगांत वावरतांना सत्व, रज आणि तम हे तिन्ही गुण ज्याप्रमाणांत पाहिजेत त्याच प्रमाणांत ते तिन्हीहि गुण अंगीं बाळगून जे जगांत मन मोकळे करून वावरतात अशा सुज्ञ मंडळी सारखे संत प्रोत्साहन देणारें असल्यामुळें फक्त एकाच गुणाची वाढ करणाऱ्यांनीं जगांत कितीही घोंटाळा उडवून देण्याचा प्रयत्न केला तरी त्यापासून भीति वाटणें कसें शक्य असणार ! ह्मणूनच पृथ्वी फिरते अशी कल्पना ज्या आधारावर केलेली आहे तेच आधार लक्षांत घेऊन ज्या आधारावरून पृथ्वी

फिरत नाहीं अशीहि कल्पना करतां येते ते आधार सांगितलें. चालणाऱ्या गाडींतून गाडींत बसणाऱ्यांना गाडी चालत नाहीं असें वाटून स्थिर असलेलींच घरें आणि झाडें चालतांना दिसतात त्याचप्रमाणें फिरणाऱ्या पृथ्वीवरून स्थिर असलेले सूर्य, आणि चंद्र चालतांना दिसतात अशी जरी कल्पना करून पृथ्वी फिरते आणि सूर्य चंद्र स्थिर आहेत असें जरी वाटलें तरी चालणाऱ्या गाडींत जसें धक्के बसतात आणि गाडींत ठेविलेल्या भांड्यांतील पाणी डगमगतें त्याप्रमाणें पृथ्वीवरील पाणी जोपर्यंत डगमगत नाहीं आणि पृथ्वीवर राहणाऱ्यांना एक सारखे धक्के बसत नाहींत तोंपर्यंत पृथ्वी फिरते असें कसें वाटावें आणि कां वाटावें ? कारण एका सेंकडांत १५०० फूट गति असलेल्या पृथ्वीवर सतत धक्के बसून भोंड सुद्धां आपटल्याशिवाय कशी राहणार ? परंतु सतत असें धक्के तर बसत नाहींतच पण उलट मोडकीं तोडकीं घरेंहि कोसळून सुद्धां पडत नाहींत आणि भूकंप जेव्हां होतो तेव्हां मात्र मजबूत घरेंहि कोसळून पडतात आणि भूकंप ल्हान प्रमाणावर जरी असला तरी घरांत असलेल्या

उतरंडी सुद्धां हलतात. मग असें असतांना आणि पृथ्वीवर असलेली रेती आणि वाळलेलीं पानें सतत उडत राहत नसतांना पृथ्वी फिरती नसून ती स्थिरच आहे अशीहि कल्पना करण्यास हरकत कशी येणार? अति वेगानें चालणारें चक्र दुरून स्थिर दिसतें परंतु त्या चक्रावर कोठेंहि बोट सुद्धां ठेवतां येणें अशक्य असतें त्याचप्रमाणें अति वेगानें फिरणाऱ्या पृथ्वीपासून दूर राहणाऱ्यांनीं पृथ्वी स्थिर आहे असें म्हटलें असतें तर तें चाललें असतें परंतु पृथ्वीवर राहणाऱ्यांनाच पृथ्वी स्थिर आहे असें वाटणें कसें शक्य झालें असतें आणि अशा गति असलेल्या पृथ्वीवर कोठेंहि बोटसुद्धां लावण्याची कोणाची छाती झाली असती! परंतु तसें नाहीं म्हणूनच पृथ्वी फिरत नाहीं हें सिद्ध होतें आणि त्याच कारणामुळें पृथ्वी आंसा भोंवतीं फिरते आणि आंसाभोंवतीं फिरतां फिरतां सूर्याच्या भोंवतालहि फिरते अशी कल्पना करण्यापेक्षां पृथ्वी फिरत नाहीं अशीच कल्पना करणें जास्त सयुक्तिक दिसतें. मग हीच कल्पना पूर्वीं पासूनहि असल्यामुळें आणि पृथ्वीला असलेला आंसही कोणी पाहिलेला आहे असें सांगत

नसल्यामुळें जोंपर्यंत पृथ्वी फिरती आहे असें विमानांतून वर जाणारे सुद्धां सांगत नाहींत तोंपर्यंत पृथ्वी स्थिर आहे अशीच कल्पना करणें ज्यास्त खात्रीलायक वाटून पृथ्वी फिरती आहे अशी कल्पना करणें हा नवीन शोध आहे असें कसें म्हणतां येणार? म्हणूनच पृथ्वी स्थिर आहे हे ज्या आधारावरून सांगतां येतें ते आधार सांगितलें. तसेंच पृथ्वीवर असणारें सर्वच पहाड आणि पर्वत नैसर्गिक नसून ते कोठें नैसर्गिक आहेत आणि कोठें कृत्रीम आहेत हें सांगितले आणि नैसर्गिक असलेल्या जमीनींत, मग ती जमीन उंच असो अथवा नीच असो, निरनिराळे जातीचे एकमेकावर जेथें थर आहेत त्या ठिकाणीं नैसर्गिकपणा असून ज्या ठिकाणीं भेसळ आहे त्या ठिकाणीं कृत्रिमपणा आहे असेंच सांगितलें. त्याच प्रमाणें नद्या व तळीं कोठें नैसर्गिक आहेत आणि कोठें कृत्रीम आहेत हें सांगून आज करोडा रुपये खर्च होऊन पाट बांधाऱ्यांचीं कामें आणि मोठमोठालें तलाव बांधलेलें दिसत असल्यामुळें पाण्यालाच फक्त शक्ति नसुन ज्या ठिकाणीं पाण्याचें प्रवाह पहाड

फोडून वाहतात त्याठिकाणीं डोहहि असल्यामुळें कुत्री-मपणा कसा आहे हे सांगितलें आणि पावसाळ्यांत आकाशांतून पडणारें पाणी चोहोंकडे एकसारखें जरी असलें तरी त्याच पाण्याला निरानिराळ्या प्रवाहांतून हतांना जें पावित्र्य येतें तें पावित्र्य पाण्यामुळें नसून ज्या प्रवाहांतून तें पाणी वाहतें त्या प्रवाहाला जें नांव आहे त्या नावांमुळें पावित्र्य असल्यामुळें प्रवाहाचा आणि प्रवाहाला असलेल्या नांवांचा संबंध कसा आहे हेहि सांगितलें. अशा प्रकारें बरेंचसें विचार सांगितलें आणि तसें सांगतांना कांहीं कल्पनाहि सांगि-तल्या. सुज्ञ मंडळींनीं जरी प्रोत्साहन दिलें तरी विरोध करणाऱ्यांनींहि विरोध करण्यास कमी केलें नाहीं. सुज्ञ मंडळी जशी जगांत नेहमीं राहणारीं आहेत त्याच प्रमाणें विरोध करणारेहि नेहमीं जगांत राह-णारेंच आहेत. कारण जगांत ईश्वरानेंहि जेव्हां जेव्हां अवतार सुद्धां घेतले तेव्हां तेव्हां त्याच्या बरोबरच शेषाला आणि लक्ष्मीला सुद्धां अवतारहि घेऊनच यावें लागलें आणि असा अवतार घेतल्यानंतरहि कृष्णावतारांत तर शेषावतारी बळरामानें श्रीकृष्णाचा सुद्धां पदोपदीं विरोध

करण्यास कमी केलें नाहीं इतकेंच नाहीं तर श्रीकृष्णाचा ओढा पांडवाकडे पाहून बळीराम दादानें आपला ओढा कौरवाकडे दाखविण्यासहि कमी केलें नाहीं. मग ईश्वरा-पासून निर्माण झालेल्या जगांत सर्व जिवांच्या ठिकाणीं ईश्वराचा सात्विक अंश जरी असला तरी त्या बरोबरच शेषाचा तमोगुण आणि मायावी लक्ष्मीचा रजोगुणही असल्याशिवाय कसा राहणार ? आणि ज्याअर्थी प्रत्येक जिवाच्या ठिकाणीं हे तिन्ही गुण आढळतात त्याअर्थी ईश्वर एकटा नसून त्याच्या बरोबरच शेष आणि लक्ष्मी आहे हेंहि पटल्याशिवाय कसें राहणार ? मग मनुष्य रूप धारण करणाऱ्या जिवांत सात्विक गुणच फक्त राहिला पाहिजे अशी कल्पना सुद्धां करून कसे चाल-णार ? आणि अशी कल्पना जरी कोणी केली तरी ती जगांत वावरणाऱ्यांना तारे कशी पटणार ? असें असलें तरी ज्याप्रमाणें ईश्वरानें तमोगुणी दुतोंडी विषारी शेषाला अंगाखालीं दाबून ठेवून त्यावर शयन केलेलें आहे आणि मायावी लक्ष्मीला सेवा करावयास लाविलें आहे त्याचप्रमाणें जगांत वावरणाऱ्यांनींहि केलेलें आहे म्हणूनच अशा ईश्वर स्वरुपीं असलेली

**सुज्ञ मंडळी** जगांत धन्य आहेत आणि त्या योगेंच जगहि चाललें आहे. कारण तसें जर नसतें तर सात्विक गुणाचीच फक्त वाढ करणाऱ्या साधूंनीं जगाला केव्हांच जंगल तरी करून सोडला असतां अथवा तमोगुणाचीच फक्त वाढ करणाऱ्या भोंदूंनीं जगांत घोंटाळाच घोंटाळा उडवून जगाची राख-रांगोळी तरी केली असती अथवा रजोगुणाचीच फक्त वाढ करणाऱ्यांनीं जगांत कोणाचीच पर्वा न करतां एकलकोंडेपणाचेच महत्व वाढविलें असतें. परंतु ज्या अर्थीं तसें झालें नाहीं आणि जगांत वावरणारे साधूंचा आदर ठेवितात आणि भोंदूंच्या झोंपडींत सांपडत नाहींत आणि आपापसांत प्रेमानें वागून एकमेकांची पर्वाहि करितात त्याअर्थीं जगांत सुज्ञ मंडळी आहेत हें पटल्या-शिवाय रहात नाहीं म्हणूनच जगांत वावरतांना जर भीति वाटत असेल तर ती भीति सुज्ञ मंडळींची गांठ पडेतोंपर्यंतच असते यांत संशय नाहीं. एकदां सुज्ञ मंडळीची गांठ पडली इतकेंच नव्हे तर त्यांची नुसती जाणीव जरी झाली तरी ती जाणीव जसजशी होत जाते त्याच मानानें भवभयहि हरण

होत जातें आणि त्या योगें जसजसा भव संदेह फिटूं लागतो तसतसा ईश्वराच्या कलंकी अवताराचा काळहि जवळ येत चालला आहे ह्याची खात्री पटते. कारण कलंकी अवतारांत विश्व जनाचा भवसंदेह नाहींसा करणें हेंच ईश्वराचें ध्येय असल्यामुळें आज ज्या योगें भवसंदेह नाहींसा होतो असें किती तरी प्रकार जगांत दृष्टोत्पत्तीस पडत आहेत! जगांत भांडणामुळें एखादें कार्य होत नाहीं असें ह्मणावें तर विवाहादि कार्यांत चोऱ्या आणि भांडणें हटकून होतात हें प्रत्येकांना माहीत असूनहि विवाहादि कार्यें बंद पडलेली नाहींत इतकेंच नाहीं तर अशा कार्यप्रसंगी चोराची भीति न बाळगतां दागदागिनें घालून मिरविण्यासहि कोणी कमी करीत नाहींत आणि भांड-खोरांची पर्वा न करितां त्यांच्याबद्दल सावध राहून जे मदत करतात त्यांच्या सहायानें प्रसंगहि साजरे होतच आहेत. मग भांडणें होतात असें ह्मणूनच जगांत कोणतेहि कार्य होणें बंद तरी कसें पडणार? आणि तमोगुणी प्रकारहि जगांत नेहमीं राहणारेच असल्यामुळें चोऱ्या आणि भांडणासारखें विषारी

३११

तमोगुणी प्रकार ह्या जगांतून अगदींच नाहींसे झाले पाहिजेत असें जगांत वावरणारे तरी कसें म्हणूं शकणार! चोऱ्या करणें वाईट आहे हें लहानापासून थोरांपर्यंत आणि सज्ञानापासून अज्ञानापर्यंत सर्वांना जरी माहीत आहे आणि धार्मिक दृष्ट्या तें पाप आहे इतकेंच नव्हें तर राजकारणांत शिक्षा होते ह्याचीहि त्यांना जाणीव आहे तरी जगांत वावरतांना घर मोकळें ठेवून चालत नाहीं आणि पेटीला कुलूप लावून चोऱ्या न होतील असाच बंदोबस्त जर ठेवावा लागतो तर भांडण वगैरे करणें हें वाईट आहे असा नुसता उपदेश करूनच जगांत निभाव तरी कसा लागणार! चोरी करणारे चोऱ्या करीतच जातात आणि त्यांना शिक्षाहि मिळतच जाते त्याच प्रमाणें भांडणासारखे तमोगुणी प्रकार करणाऱ्यांनाहि शिक्षा मिळतच जाते आणि इतरांच्या विश्वासावर कार्येहि होतच राहतें. ह्मणून तमोगुणी प्रकारांचीच जपमाळ घेऊन न बसतां त्यांच्या बद्दल सावधगिरी ठेवून इतरांवर विश्वास ठेविला ह्मणजे विवाहादि कार्या-प्रमाणेंच जगांत होणारी इतर कार्येंहि होतच जातात ह्यांत

संशय नाहीं. असें असल्यामुळें चोरांचें आणि भांडखोरांचें नांव घेऊन त्यांचेंच महत्व वाढविण्यापेक्षां त्यांच्या बद्दल सावध राहून जे मदत करितात त्यांचीच नांवें जेव्हां घेतलीं जातात तेव्हां त्यायोगें भवभवच हरण झाल्याशिवाय राहत नाहीं. आणि अशी जाणीव ज्यामानानें होतें त्या मानानेंच एकी कशी होते ह्याची जाणीव झाली ह्मणजे भवसंदेह फिटत जातो यांत संशय नाहीं. मग मदत करणाऱ्यांचीच नावें घेऊन जगांत जर वावरलें तर जगांत एकी नाहीं असें कोण ह्मणेल? आणि बेकीची जर पर्वाच न केली तर ज्यायागें बेकी होते ते प्रकार कोणत्याहि कार्यांत आडवें येणार तरी कसें आणि त्यानांच फक्त महत्व तरी कोण देणार? चार भांडीं एका ठिकाणीं असलीं ह्मणजे भांड्याला भांडे लागलें कीं जो नाद होतो तसाच नाद एकी मध्येंहि होतो आणि तसा नादहि होतच जाणार. मग अशाहि प्रकारांना महत्व तरी कसें येणार? आणि त्यांनाहि महत्व तरी कोण देणार? मनुष्यांना कोणताहि रोग असला तरी सर्व रोगी दवाखान्यांत एकाच रजिष्टर-

मध्यें नोंदलें जाऊन अशा रोग्यांना सारखेंच कामाला नालायक असल्याचें जसें ठरविलें जातें त्याप्रमाणें कोणत्याहि कारणामुळें भांडणासारखें तमोगुणी प्रकार करणारे भांडखोरहि एकाच मालिकेंत गणिलें जातात आणि ह्मणूनच त्यांना जपावें लागतें ह्मणजे त्यांच्या-पासून सावध राहावें लागतें. जगाशीं संबंध नसला तर गोष्ट वेगळी पण जेथें जगाचे व्यवहार चालू आहेत त्या ठिकाणीं मुळींच भांडणें होत नाहींत असें एकहि ठिकाण पृथ्वीवर तरी नाहीं कारण सर्व ठिकाणीं भांडणें नेहमीं चालूच राहतात आणि घरोघरीसुद्धां लहान सहान गोष्टी वरूनहि भांडण होऊनच जातें. म्हणूनच तमोगुणी प्रकारांना महत्व नसून जे मदत करतात त्यांनांच जगांत महत्व आहे आणि तसें असल्यामुळेंच तमोगुणी प्रकारापासून जी भीति उत्पन्न होतें ते भवभय सुज्ञ मंडळीच्या सहवासानें हरण झालें म्हणजे जेव्हां भवसंदेह फिटतो तेव्हां जो प्रकाश पडतो त्या प्रकाशांत जगांत चालणारे किती तरी व्यवहार स्वच्छ दिसूं लागतात ? ज्याकारणामुळें भांड ण्याचें खुसपट निघूं पाहतें आणि कित्येक मंडळी

भांडणें उकरून काढतात अशा कारणांपैकीं एक कारण हिंदु धर्मांत असलेली अस्पृश्यता काढून टाकण्या-बद्दलचेंहि असल्यामुळें त्या विषयासंबंधानें जेव्हां विचार केला आणि थोडासा पत्र व्यवहार केला तेव्हां बराच उलगडा होऊन शेवटीं भवसंदेहच फिटला आणि भांडण करणाऱ्यांत सुद्धां प्रेम असतें ह्याची खात्री झाली. दृष्टी कोन वेगळा असल्यामुळें मतांतर जरी दिसलें तरी तें विचारांती नाहींसें होऊन पुढें भांडण्याचेंहि कारण राहत नाहीं आणि गैर समजुतीमुळें होणारा घोंटाळाहि पार नाहींसा झाल्याशिवाय राहत नाहीं. नैसर्गिक असलेल्या हिंदु धर्मांत मूर्तीला जोंपर्यंत मान्यता आहे तोंपर्यंत त्या धर्मांत नैसर्गिक जाति कितीहि असल्यां आणि त्या वाढत गेल्या तरी प्रत्येक जातींतील मंडळी आपल्या रिवाजाप्रमाणें निरनिराळ्या रितीनें मूर्तिपूजा करणें साहजिक असल्यामुळें त्याच्यांत स्पृश्या-स्पृश्यतेचेही विचार राहणारेच आहेत. ह्मणूनच मूर्ति-पूजा जशी धर्माची बाब आहे त्याचप्रमाणें स्पृश्या-स्पृश्यतेचे विचार मानणेंहि धर्माचीच बाब आहे. आणि ज्याअर्थीं इतर धर्मांतच नव्हे तर ज्या समाजांत

स्पृश्यास्पृश्यतेचे विचार मानले जात नाहींत त्याठिकाणीं प्रार्थना मंदिरांत मूर्तिपूजा वर्ज्य आहे असें प्रत्यक्ष पाहण्यांत येतें त्याअर्थी ज्यांना स्पृश्यास्पृश्यतेचे विचार मानावयाचे नाहींत त्यांनीं मूर्तिपूजा सोडलीच पाहिजे हें सिद्ध होतें. मग स्पृश्यास्पृश्यतेचे विचार न मानणाऱ्या धर्मांत असलेल्या मंडळी प्रमाणेंच हिंदु धर्मांतहि स्पृश्यास्पृश्यतेचे विचार नसावेत असें ह्मणणारी मंडळी त्यांना वर्ज्य असलेली मूर्तिपूजा ज्या देवळांत होते त्या देवळांत जाऊन मूर्तिपूजा करणें योग्य आहे असें कसें ह्मणू शकणार ? आणि ज्यांना मूर्तिपूजा वर्ज्य आहे इतकेंच नव्हे तर तशा पूजेचा जे मनापासून तिटकारा दाखवून मूर्ति भंग सुद्धां करण्याचा प्रयत्न करतात ते आपल्या धर्माप्रमाणें अस्पृश्यता मानूं नये असें ह्मणत असतांना ज्या देवळांत मूर्तिपूजा होते त्या देवळांत जाण्याचा सल्ला तरी कसा देणार ? म्हणूनच कांहीं मंडळींनीं असा विरोधी सल्ला जर दिला तर त्यामुळें घोटाळा उडणें साहजिक असल्यामुळें आणि तसें करणें कोणत्याही धर्माप्रमाणें नसल्यामुळें त्यायोगें भव सागरांत उत्पन्न होणाऱ्या भोंवऱ्यांत

सल्ला देणाऱ्याना आणि नसा विरोधी-सल्ला ऐकणाऱ्यांना अशा दोघानांही गटांगळ्या मात्र खाव्या लागणार यांत संशय नाहीं कारण स्पृश्यास्पृश्यतेचे विचार न मानणें सोडल्या बरोबर मूर्तिपूजाहि सोडावी लागते हें ज्या धर्मांत स्पृश्यास्पृश्यतेचे विचार मानीत नाहींत अशा धर्माकडे पाहून प्रत्यक्ष अनुभवास येत असल्यामुळें जर स्पृश्यास्पृश्यतेचे विचार न मानणाऱ्यांनीं मूर्तिपूजा करणें अथवा मूर्तिपूजा करणाऱ्यांनीं स्पृश्यास्पृश्यतेचें विचार न मानणें जगांत शक्य नाहीं तर जे आहे त्याच्या उलट वर्तन करणें कोणत्याहि धर्माप्रमाणें होत नसल्यामुळें अधर्म आहे असें जगांत वावरणाऱ्यांनातरी वाटल्याशिवाय कसें राहणार ? म्हणूनच ज्यांना स्पृश्यास्पृश्यतेचे विचार मान्य नाहींत ते कोणाच्याहि झांपडींत न जातां प्रार्थना मंदिरांत जाऊन ईश्वराची फक्त प्रार्थनाच करतातहि. मग ज्या मंदिरांत मूर्तिपूजा होते त्या मंदिरांत मूर्ति समोर असल्यामुळें भजन पूजन करीत असतांना जि-तकीं वाद्यें वाजतील तितकी वाद्येंच नव्हें तर नगाऱ्याचा आवाजसुद्धां स्फूर्तिदायक असून त्यायोगें मूर्तिकडे डोळे

उघडे ठेवून लक्ष लावितां लावितां मूर्तिचे ठिकाणीं मन तल्लीन होऊन जातें ह्मणून ज्या ठिकाणीं मूर्ति समोर नसल्यामुळें डोळे झांकून प्रार्थना करावी लागते अशा ठिकाणीं थोडा आवाज झाला कीं मनाची चल बिचल होऊन डोळें उघडणें साहजिक असल्यामुळें प्रार्थना करीत असतांना कोणत्याहि प्रकारचें वाद्य वाजविलें जाणें कसें शक्य असणार? म्हणूनच प्रार्थना करीत असतांनां मनाची चल बिचल होऊं नये ह्या हेतूनें अशा ठिकाणीं प्रार्थनेच्या वेळीं वाद्यें वाजवूं नयेत असें जर सूज्ञ मंडळींनीं सांगितले आणि रहदारीच्या ठिकाणीं असें प्रसंग येणें साहाजिक असल्यामुळें प्रार्थनेच्या वेळा प्रार्थना करणाऱ्यांनींहि ठरवून टाकल्या तर उलट वर्तन केल्यानें जी भीति उत्पन्न होते ती भीति नाहींशी होऊन त्यायोगें भयभय हरण झालें ह्मणजे शेवटीं भय संदेह फिटल्या शिवाय कसा राहणार? आणि वाद्य वाजविणें ह्मणजे एक प्रकारें बोलावणेंच असल्यामुळें असा बोलावण्याचा इशारा प्रार्थनेच्या वेळीं मुद्दाम तरी मग कोण कोणाला कशा करितां देणार! आणि प्रार्थनेची वेळ सोडून इतर वेळीं असा इषारा मिळाला

ह्मणजे सर्वांना त्या पासून आनंद झाल्याशिवाय तरी कसा राहणार? अशा प्रकारें जगांत वावरतांनां कांहीं मंडळीच्या दुटप्पी वर्तनामुळें कितीहि घोंटाळ्याचे प्रसंग आले तरी सुज्ञ मंडळीच्या कृपेनें जेव्हां भवभय हरण होऊन भवसंदेह फिटतो तेव्हां जगांत जर कशाला श्रेष्ठत्व असेल तर ते इतर कशालाहि नसून फक्त कर्मयोगा लाच श्रेष्ठत्व आहे ह्याची जाणीव झाली ह्मणजे जगांत वावरणाऱ्यांनां तरी इतरांकडे पाहून हळहळत बसण्याचें कारण राहत नाहीं. मग अशा जनतेला रडके तोंड करण्याचें प्रसंग जगांत तरी येणें कसें शक्य असणार?

जगांत कर्म योग श्रेष्ठ आहे आणि कर्म योगामुळेंच जगाची वाढ होत आहे ह्मणूनच "अति लोभो न कर्तव्य: लब्धंनैव परित्यजेत। अति लोभाभि भूतस्य चक्रं भ्रमति मस्तके" ह्या उक्तीला जगांत फारच मोठें महत्व आहे. ह्या उक्तीचा पूर्वार्ध ज्यांनीं जनतेला पटवून दिला ते जसें जगांत लोकमान्य झालेले आहेत त्याच प्रमाणें ज्यांनीं उत्तरार्ध पटवून दिला तेहि जगांत विश्वमान्य झालेले आहेत आणि त्या योगेंच लोक-

मान्यांच्या कार्याचीच पूर्तता विश्वमान्या कडून होत असल्यामुळें अति लोभ केला म्हणजे चक्राशिवाय दुसरा विषयच डोक्यांत जेव्हां येईनासा होतो तेव्हां वरील उक्तींत असलेल्या तत्वाचीच खात्री पटते आणि लोकमान्य आणि विश्वमान्य हे दोघेहि जगांत धन्य आहेत ह्याचीहि खात्री पटल्या शिवाय राहत नाहीं. आणि हे तत्व जसजसें पटत जातें तसतसें कर्म योगाचेंच रहस्य जेव्हां समजतें तेव्हां विद्यार्थी दशेंत असतांनां विद्या संपादन करण्याकरितां जीं कर्में करावीं लागतात तीं कर्में करून विद्यार्थी ज्या मानानें विद्या संपादन करतात त्या मानानेंच ते विद्वानहि होतच जातात आणि पुढील आश्रमांत त्यांचा प्रवेश झाला ह्मणजे त्या आश्रमानुरूप कर्में करीत जाऊन त्यांच्यांत जशी वाढ होते त्याच प्रमाणें ते जगाच्याहि वाढीस कारण होत जातात. मग शाळेंत गेल्या बरोबरच एकदम एका दिवसांत एम्, ए. झाले पाहिजे असें कोण ह्मणूं शकणार? आणि जर कोणी असें ह्मटलेंच तर त्यांच्या डोक्यांत चक्राशिवाय इतर विषय तरी कोणता येऊं शकणार? ह्मणूनच जगांत वावरणारे की

योगाकडे ज्यास्त लक्ष देतात आणि कोणीहि त्यांना कितीहि झांपडींत आणण्याचा प्रयत्न केला तरी त्यांच्या झांपडींत सांपडून अकर्म कर्में न घडतील ह्याबद्दल जेव्हां ते सावध राहतात तेव्हांच त्यांच्याकडून जगाची वाढ होऊन शेवटीं जगांत कर्म योगच श्रेष्ठ आहे हें ठरतें आणि सकाळीं उठल्या पासून रात्रीं निजे तों पर्यंत आणि पुन्हां सकाळीं उठे तों पर्यंत एका दिवसाच्या मुळापासून शंभर वर्षांच्या ह्यातीच्या पर्यंत घटके घटकेला जीं कर्में करावयाचीं असतात तीं सर्व कर्में कर्में ह्मणून जरी असलीं तरी मनाला वाटतील तीं कर्में वाटेल त्यावेळीं करणें अकर्म कर्म केल्या सारखें होऊन योग्य वेळीं योग्य कर्म करणेंच कर्म ठरतें आणि अशीं कर्में जर घडलीं तरच जगाचीहि वाढ होते हें ठरतें. अशा रीतीनें जगांत कर्म याग श्रेष्ठ आहे म्हणूनच त्यायोगें घरावर तुळशीपत्र ठेवून स्वार्थ त्याग न करतां घराची मर्यादा वाढवून ज्याना स्वार्थ त्याग करावासा वाटतो यांनाच जगांत राहतां येऊन जगाचीहि वाढ करतां येते याची खात्री पटते. कारण जे घरावर तुळशीपत्र ठेवून स्वार्थ त्याग करतात त्यांच्या त्या

२८०६९

मोकाट घरांत पराकेय घुमणें साहाजिक असल्यामुळें त्यांच्या त्या परोपकारानें त्यांनाच त्रास होतो असें नाहीं तर त्यायोगें जगांत मग राहतां येणें शक्य नसल्यामुळें आणि त्यांचा तो स्वार्थत्याग जगाची वाढ खुंटवीत असल्यामुळें जगालाही तें रुजूं असणें शक्य नसतें. म्हणूनच जगांत वावरणारे घरावर तुळशीपत्र ठेवण्याची भाषा चुकुनसुद्धां कधींही बोलत नाहींत इतकेच नाहीं तर ते आपल्या घराची काळजी घेऊन आणि जे त्यांच्या करितां झटतात त्यांच्याहि घरांची काळजी घेऊन जगाची वाढ करतात म्हणुन जगाच्या कल्याणा करितां झटणारेहि जगाचीच वाढ करण्याकरितां कारण असतात यांत संशय नाहीं. असें प्रकार जगांत आहेत म्हणूनच जगांत बावरणाऱ्यांना इतरांच्या परोपकाराच्या भरंवशावर राहणें नीच पणाचें वाटतें आणि इतरांनी केलेला परोपकार त्यांना मोठेपणा जरी आणणारा असला तरी तो परोपकार ज्यांच्यावर होतो त्यांना तो आयदीपणा आणणारा असल्यामुळे त्याची त्यानाच जेव्हां लाज वाटूं लागते तेव्हांच त्यांच्यांत असलेला आयदीपणा जाऊन त्यांना कर्म योगाचें रहस्य समजतें

अशाप्रकारे कर्म योगाचें रहस्य समजलें म्हणजे आयत्या विळावर नागोबा होऊन बसण्याचें ध्येय ठेवून जे भांडण करतात त्यानाहि तोंड देऊन जे जगांत वावरतात ते जेव्हां केलेल्या कर्माप्रमाणें फले भोगण्यास तयार होतात तेव्हां त्यांच्या कडूनहि जगाचीच वाढ होते. आणि अशा रीतीनें जगाची वाढ करीत असतांना कर्माप्रमाणें जेव्हां फल मिळतें तेव्हां भांडण सुद्धां करण्याचेंहि कारण राहत नाहीं. उदाहरणार्थ बी. ए. होण्याकरितां विद्यार्जन केलें तर बी. ए. च होणार यांत संशय नाहीं. परंतु जर बी. ए. होत नाहीं तर तसें होण्याकरितां जे विद्यार्जन करावें लागतें तें बरोबर झालें नाहीं असें म्हणणें भाग पडतें. मग भांडणें कां? आणि बी. ए. परिक्षेंत उत्तीर्ण झाला म्हणजे त्याला बी. ए. कोण म्हणणार नाहीं? आणि परिक्षेंत उत्तीर्ण न होणाऱ्यानें जर आग्रह धरिला आणि बी. ए. झालो असेंच म्हणावयास सांगून भांडण जरी केलें तरी त्याला बी. ए. म्हणणार तरी कोण? आणि त्याला भांडणाच्या भीतीनें जर कोणी बी. ए. म्हटलेंच तर तोहि बी. ए. नुसत्या म्हणण्यानेंच होणार तरी कसा! अशा पकारें

जो हक्कदार असेल तोच हक्कदार होतो. आणि जगांत हक्कदार आहेत म्हणूनच जगाची वाढ होत आहे. आणि असे हक्कदारच जगांत वावरतांना स्वार्थत्याग करतात म्हणजे एक रुपया मिळवून बारा आणे खर्च करतात तेव्हां त्यांचा तो स्वार्थत्याग परमार्थ होऊन जगालाहि रुजूं होतो. मग कांहींहि न मिळावणें म्हणजेच स्वार्थ-त्याग होतो असें म्हणूनच स्वार्थ नसल्यावर त्याग तरी कसा करतां येणार आणि कशाचा त्याग करून त्याला तो स्वार्थ त्याग म्हणणार ! स्वकष्टार्जित धनाची जे थट्टा करतात इतकेंच नाहीं तर जवळ असलेलें धन सुद्धां लाथाडून जे फकिरी पत्करतात त्यांनाहि जगांत जर एखादें कार्य करावयाचें असलें, तर कार्यारंभीच धनाची अपेक्षा करावी लागुन ज्यांची त्यांनीं पुर्वीं थट्टा केलेली असते अशा जगांत वावरणाऱ्याच्याच तोंडाकडे त्यांना पहावें लागतें. मग जगांत वावरतांनां फकिरीची वाढ करण्यापेक्षां धनाचीच वाढ करणें जगाला तरी रूजूं असल्याशिवाय जग कसें चालणार ? म्हणूनच द्रव्यार्जन करणाऱ्यांनां कोणी कितीहि नांवें ठेविलीं आणि फकिरीलाच मोठें महत्व दिलें तरी अशा नांवें

ठेवणाऱ्यांचीच नव्हे तर फकिरी पत्करणाऱ्यांचीहि मदार शेवटीं जगांत वावरणाऱ्यांवरच असते यांत संशय नाहीं आणि जगांत वावरणारेहि कोणाच्याहि झांपडींत न जातां जेव्हां चोहोंकडे लक्ष पुरवून जगाची काळजी घेतात तेव्हां जगाचीहि वाढच होत असल्यामुळें ज्यां अर्थीं जगाची एकसारखी वाढ होत आहे आणि वाढ होत आहे म्हणूनच तें जग आहे त्या अर्थीं जगांत वावरणारेहि जगाची काळजी घेऊन जगाचीच वाढ करीत आहेत यांत सुद्धां संशय नाहीं. आणि जगांत जे वावरतात त्यांना योग्य दिशा दाखविण्याकरितां जगांत सुज्ञ मंडळी सारखें संत आहेत म्हणूनच जग पुढें चाललें असून जगाला जंगल होण्याची भीति नाहीं आणि भोंदूनीं सुद्धां कितीहि प्रयत्न केले तरी जगाची राख रांगोळीहि होणें शक्य नाहीं. मग सर्व प्रकारे योग्य दिशा दाखविणारी अशी सुज्ञ मंडळी जगांत असल्यावर मनांत जर कांहीं विचार आले तर ते मनांतल्या मनांतच दाबून न ठेवितां मन मोकळें करून जर कोणी त्यांना सांगितलें अथवा लेखाच्या द्वारें त्यांच्या पुढें

सादर केलें तर त्याला जगांत तरी हरकत आहे असें कोण म्हणणार ? म्हणूनच मीहि माझा लेख ईश्वर स्वरूपी असलेल्या सुज्ञ मंडळी सारख्या संतापुढें ठेवून त्यांची नम्रपणें प्रार्थना करणें हीच माझ्या लेखाची प्रस्तावना आहे असें समजून मी तरी माझ्या लेखाची ही प्रस्तावना येथेंच संपविण्याची परवानगी घेतों आणि गतवर्षी " गृह आणि गृहस्थ " ह्या विषयावर लेख लिहिल्यानंतर त्याला योग्य असलेला काळ गृहस्थाश्रमाचाच असल्यामुळें " गृहस्थाश्रम " हाच ओघानें आलेला विषय लेखा करिता ठरवून लेखाला आरंभ करण्या पूर्वी सुज्ञ मंडळीची प्रार्थना केल्यानंतर ईश्वराची प्रार्थना करणें ओघानेंच येत असल्यामुळें ईश्वराचीहि प्रार्थना करण्याची परवानगी घेतों

॥ श्री ॥



# ईश्वर प्रार्थना.

जगांत जें जें कांहीं ह्मणून दृष्टोत्पत्तीस पडत आहे त्या सर्वांच्या मुळाशी काय आहे ह्याचा विचार केला ह्मणजे प्रथम बी आहे किंवा झाड आहे ह्या बद्दल सुद्धां वाद घालीत बसण्याचें कारण राहत नाहीं. एका बी पासून एकच झाड निघतें आणि झाड पुर्णावस्थेंत आल्यानंतरच त्याला पुढें जी पुष्कळ फळें लागतात त्या सर्व फळांत जशा बिया असतात त्याप्रमाणें एका झाडाला एकच बी निघून एका बीलाच पुष्कळ झाडें लागत नाहींत म्हणून एकाच झाडाच्या मूळांशीं असलेली एकच बी प्रथम आहे असे म्हणण्यास हरकत येत नाहीं. तरी पण प्रथम बी असो किंवा झाड असो जें

कांहीं प्रथम असेल तें ज्याच्यापासून उत्पन्न झालें किंवा ज्या शक्तीच्या योगानें निर्माण झालें ती ज्याची शक्ति असेल त्यालाच जगांत वावरणाऱ्यांनीं जर ईश्वर ह्मटलें तर त्यांत आश्चर्य कसलें ? आणि जोंपर्यंत आई बापांपासून मुलांचा जन्म होत आहे तोपर्यंत प्रथम असलेल्या मूळ पुरुषाला ईश्वर म्हणून ओळखिलें तर तेंहि जगांत वावरणाऱ्यांना पटल्या शिवाय कसें राहणार ! कांहींनीं ईश्वर नाहीं असेंच ह्मणून जरी नास्तिक विचार केला तरी तशा नुसत्या नकारार्थी ह्मणण्यानेंच ईश्वराचें असलेलें अस्तित्व कसें नाहींसे होणार ? कारण जर ईश्वर नाहीं तर मूळांशीं कोणाची आणि कोणती शक्ति आहे हें सांगून त्यांनीं आपल्याहि विचाराला नकाराची बाधा होऊं देण्याचें कारणच राहूं दिलें नसतें. ईश्वर जर नाहीं तर काय आहे हें स्पष्ट सांगितलें पाहिजे आणि जों पर्यंत तसें कोणी सांगत नाहींत तों पर्यंत नकारार्थी म्हणण्यानें अस्तित्वाचेंच महत्व वाढणार यांत संशय नाहीं आणि म्हणूनच नास्तिकांच्या ईश्वर नाहीं असें म्हणण्यानें सुद्धां ईश्वराचेंच अस्तित्व दुणावतें असें म्हणल्यावाचून राहवत नाहीं. असें अस-

तांना जर कोणी त्या शक्तिला निसर्गाची शक्ति म्हटले आणि तसें म्हणणाऱ्यांनीं आपल्याला नास्तिक म्हणवून न घेतां निसर्गू म्हणवून घेऊन नकारार्थी म्हणणें टाळण्याचा प्रयत्न जरी केला तरी तसें करण्यानेंहि ईश्वराच्या अस्तित्वाला बाध येत नाहीं हें खास. अशा प्रकारें मूळाशीं असलेल्या शक्तीची जाणीव झाली म्हणजे ती ज्याची शक्ति आहे अशा निसर्गा! ईश्वरा! मूळ पुरुषा! तूं धन्य आहेस आणि तुझी लीला अगाध आहे असें म्हटल्यावाचून जगांत वावरणाऱ्यांना तरी जगांत राहतां येणें शक्य नाहीं. जगांत वावरणाऱ्या मांजरीनें सुद्धां डोळे मिटून दूध पिण्याचा जरी प्रयत्न केला आणि दूध पितांना कोणी पाहत नाहीं असें तिला वाटलें तरी तिच्या पाठींत वडगा बसला म्हणजे तिला दूध पितांना कोणी पाहिले किंवा नाहीं ह्या बद्दल संशय येणें तिला जसें शक्य नाहीं आणि कोणी तरी पाहिलेच ह्याबद्दल तिची खात्री पटते त्याचप्रमाणें जगांत वावरणाऱ्या जिवांना दुःखें भोगावीं लागलीं म्हणजे जगांत शिक्षा करणारा कोणी आहे किंवा नाहीं ह्या बद्दल संशय येण्याचेंहि कारण सुध्दां राहत नसून

कितीहि डोळे मिटून अंधारांत वाईट कर्मं केलेलीं असलीं तरी तिकडें सुद्धां लक्ष देऊन पहाणारा कोणी तरी आहे ह्याची खात्री पटल्याशिवाय राहत नाहीं आणि शिक्षा जरी झाली तरी शिक्षा करणारा कृपाळूंच आहे असेंहि त्यांच्यानें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. कारण योग्य वेळीं योग्य शिक्षा न मिळाल्यामुळें पुढें मोठाले अपराध घडणें साहाजिक असतें आणि म्हणूनच योग्य वेळीं शिक्षा करणाऱ्यांना सुध्दां ते कृपाळूंच आहेत असें म्हटल्यावाचून अपराध्यांनाहि राहतां येणें जगांत तरी शक्य नाहीं हें खास. मग अविचारी लोकांपासून विचारी लोकांचें रक्षण करून सत्याचा जय कायमचा टिकविणे हेंच ईश्वराचें ध्येय असल्यामुळें जगांत वावरतांना ज्यांना शिक्षा मिळते त्यांना आपणच अपराधी आहोंत असें वाटल्या वाचून कसें राहणार ? आणि सत्य आणि मिथ्या ठरलेलें असल्यामुळें आपणाला जें आवडतें तेंच सत्य आहे आणि त्यांत जय मिळालाच पाहिजे असें ह्मणणें कसें शक्य असणार ? म्हणूनच जगांत वावरणारेहि जेव्हां जय मिळत नाहीं तेव्हां त्यांनीं ज्याला सत्य म्हटले तें सत्य नव्हतें आणि

मिथ्यालाच सत्य समजून त्यांनीं कवटाळलें असें म्हणून शेवटीं जें सत्य असतें त्याच्याच मार्गाला ते लागतात. ज्या सत्याचरणानें जगांत जय मिळतो तें सत्य तत्व आहे. लहान मुलें रडूं लागलीं म्हणजे त्यांनां भोंगेबुवा रडणाऱ्यांना धरून नेतो असें म्हणून चूप करणें अथवा लहान मुलांनीं घराबाहेर रात्रीं बेरात्रीं फिरूं नये म्हणून त्यांना धाक दाखविण्याकरितां गस्त-वाला धरून नेतो असें सांगणें जरी सत्य बोलणें नसतें तरी त्यांत सत्य तत्व असतें, म्हणून कोणतें असत्य भाषण सत्य तत्व आहे हें जे जाणतात तेच जगांत वावरूं शकतात आणि परिणामावरूनहि जेव्हां त्यांची खात्री पटत तेव्हां त्याना हट्ट धरून बसण्याचें कारण सुद्धां राहत नाहीं. सत्याचरणानें निस्तेजता येत नाहीं खास.

घरांत राहणाऱ्यांना जसा घराचा आकार पूर्णपणें घरातूनच दिसणें शक्य नाहीं त्याच प्रमाणें ईश्वराच्या तोंडांत एकाबाजूसच मावण्याजोगेंहि अगदीं लहान असलेल्या जगांत त्यामानानें अतिशयच लहान असणाऱ्या अशा जिवांना ईश्वराचा आकार पूर्णपणें जगां-तूनच दिसणें शक्य जरी नसलें तरी घराच्या पडछाये

वरून घराच्या कांहीं तरी भागाचा जसा आकार समजतो तसाच सूर्यरुपी प्रकाशणाऱ्या ईश्वराच्या तेजामुळें ईश्वराच्या आकाराची थोडीतरी जाणीव झाल्यावाचून राहत नाहीं. सूर्य तेज जसें प्रकाशतें तसेंच जिवांचेहि तेज प्रकाशत असल्यामुळें तेज:पुंज मनुष्याच्या नजरेकडे सुध्दां नजर लावणें कठीण जातें मग मनुष्यांत ईश्वराचा अंश आहे हें ज्यांना पटतें त्यांना सूर्यरुपीं तेज ईश्वराचें आहे हें पटल्याशिवाय कसें राहणार? सूर्यरुपी तेजानेंहि जगांत वावरणाऱ्यांना कितीतरी फायदा होत आहे? सूर्यरुपी तेजानें सर्व प्रकारें फायदा तर होतोच पण सूर्य तेजाच्या किरणानें शुध्द केलेल्या पाण्यामुळें जेव्हां मोठमोठाले रोग कधीं कधीं हटतात इतकेंच नाहीं तर सर्व प्रकारें इतर औषधें दिल्यानंतरहि बरें न होणाऱ्या अशा रोग्यांना पाण्याच्याच औषधानें जेव्हां हटकून गूण येतो तेव्हां "औषधं जान्हवी तोयं वैद्यो नारायणो हरी:" ह्या उक्ती पासून बराच बोध होऊन त्या उक्तीची सत्यताहि पटते कारण शुद्ध केलेलें पाणि सर्व औषधांत श्रेष्ठ ठरून जान्हवी तोयं सारखें पवित्र मानलें जात असल्यामुळें ज्यायोगानें

तें शुद्ध केलें जातें तें ज्याचें किरण आहेत तोच वैद्य असलेला सूर्य नारायण हरी आहे असें जेव्हां वरील उक्तींत म्हटल्याप्रमाणें अनुभवास येते तेव्हां सूर्य नारायणाचें तेज हरीचें म्हणजे ईश्वराचें आहे ह्याची खात्री पटते. आणि किरण चिकित्साकारांनीं " आरोग्यं भास्करा दिच्छेत " म्हटलेलें पाहून त्याचेंहि आश्चर्य जगांत वावरणाऱ्यांना तरी वाटत नाहीं खास. अशा रीतीनेंहि ईश्वराचेंच अस्तित्व पटत असल्यामुळें आणि निरनिराळ्या प्रकारानें ईश्वराचें अस्तित्व पटविलें गेलेलें असल्यामुळें बहुजन समाजाला तें जसें आजपर्यंत मान्य झालेलें आहे तसेंच तें पुढेंहि मान्य होत राहणारें आहे यांत संशय नाहीं. मग नन्नाचाच पाढा म्हणणाऱ्या नास्तिकांच्या सपाट्यांत सांपडल्यामुळें जो संशय उत्पन्न होतो त्या संशयाच्या भोवऱ्यांत सांपडून गटांगळ्या खाणें जगांत वावरणाऱ्यांना तरी कसें बरें वाटणार ? म्हणूनच नुसता नन्नाचा पाढा म्हणत राहिल्यानें शेवटीं मानेलाच झटके बसून मानच दुखणें साहजिक असल्यामुळें नास्तिक विचार सोडून देऊन सरळ रीती-नेंच विचार करणें बरें वाटतें खास. अशाप्रकारें ईश्वराचें

अस्तित्व पटलें म्हणजे मनाला कितीतरी आनंद वाटतो ? कोणतीहि गोष्ट पटणें किंवा पटत नाहीं असें म्हणणें स्वाधीनचें जरी असलें आणि अगदीं खुषीचा प्रकार असला तरी नुसतें पटत नाहीं असें म्हणूनच काम भागत नाहीं. मग ही नकारार्थी पळवाट जगांत वाव- रणाऱ्यांनां तरी फार वेळ सांथ देणें शक्य नसल्यामुळें अशा पळवाटीच्याच मार्गे लागून जगांत वावरतांना कोणालाहि कसें बरें वाटणार ? जगांत वावरणारे सरळ- रीतीनेंच सांगतात आणि त्यांना जें पटतें तेंहि सरळ रीतीनें पटल्याशिवाय राहत नाहीं आणि त्यांना त्यामुळें नकारार्थी प्रयोग करण्याचें कारणहि राहत नाहीं. अशा रीतीनें ईश्वराचें अस्तित्व पटल्या बरोबर जो आनंद होतो त्या योगानें त्याचें स्मरणहि झाल्या वाचून राहत नाहीं. मग ज्याचें स्मरण होतें त्याची मूर्ति समोर असावी ह्या हेतूनें जर जगांत वावरणाऱ्यांनीं मूर्तीपूजेला मान्यता दिली तर ते योग्य नाहीं असें कोण ह्मणूं शकणार ! आणि ज्या अर्थी नराचे नारायण होणाऱ्या पुरुषांचें सतत स्मरण राहावें ह्मणून जगांत वावरणाऱ्यांकडून त्यांचे पुतळे उभारले जातात आणि पुतळ्यांच्या

अनावरण प्रसंगी मोठा उत्साह वाटतो आणि त्यांच्या छाया चित्रांच्याहि मिरवणुकी सुद्धां थाटाने निघतांना दृष्टोत्पत्तीस पडतात त्याअर्थी ईश्वराचेहि स्मरण व्हावें म्हणूनच मूर्तिपूजेला जगांत मान्यता आहे हें पटत नाहीं असें जगांत वावरणारे तरी कसें म्हणू शकणार? जे जगांत वावरणारे असतात तीच जगांत रहणारी जनता असल्यामुळें आणि ईश्वरानेंहि आपले अवतार जगांतच घेऊन जनतेप्रमाणेंच रामकृष्णादि अवतारांत तर आपला अवतार कार्येहि केलेला असल्यामुळें ईश्वराचें अस्तित्व जनतेमध्ये आहे म्हणूनच जनता जनार्दनाकडे जर सर्वांचे लक्ष असलें तर त्यांत आश्चर्य कसलें आणि जनता जनार्दन आहे म्हणूनच जगाशीं फटकून वागणाऱ्या साधूची काळजीहि घेतली जाते त्याचप्रमाणें मोठ्यांच्यापासून झोंपडींत ती सांपडत नाहीं तेव्हां जनता जनार्दनाकडून ईश्वराच्याच कार्याची वाढ होणें साहजिक असल्यामुळें जगाचीहि वाढ करणें जर जनतेकडे भाग्यानेच आलें तर त्यांतहि आश्चर्य कसलें ? म्हणूनच जगाची ज्याअर्थी वाढ होत आहे. आणि वाढ होत असल्यामुळेंच तें जग आहे त्याअर्थी जगांत

जनता जागृत आहे असें वाटल्यावांचून राहत नाहीं. मग जनता जनार्दन जागृत असल्यावर जगांत मूर्ति-पूजेला मुळींच मान्यता नाहीं असें ह्मणून तरि कसें चालेल ? ईश्वर एकटा नसून त्याच्या बरोबरच विषारी शेष आणि लक्ष्मीहि सतत असल्यामुळेंच ईश्वराचें स्मरण केल्या बरोबर विषारी शेष चोपदाराप्रमाणें समोर उभा राहून जर भीती दाखवूं लागला तर त्याला जनता तरी भिणार काय ह्मणून ? आणि ज्यांना विषारी शेषाचीच भीति वाटेल त्यांना जनता जनार्दन तरी कोण म्हणणार ? विषारी शेषानें कितीहि गोंधळ जरी उडवून दिला तरी त्यामुळें जनता जनार्दनाला भीति वाटत नाहीं ह्मणूनच मंदिरांत सुद्धां पुजाऱ्यांनीं अथवा पंड्यांनीं कितीहि भीति दाखविली तरी त्यांनाच भिऊन न जातां जनता जनार्दन तरी मंदिरांत असलेल्या मूर्तीचें दर्शन घेऊन ईश्वराचें स्मरण केल्या शिवाय राहत नाहीं हें खास ?

जगांत थोडासा जरी अधिकार प्राप्त झालेला असला तरी त्याच्याहि दाराशीं असलेल्या पहारेकऱ्यांत विषारी शेषाचा प्रवेश झाल्याशिवाय जरी राहत नाहीं तरी

तशाहि आडदांड पहारेकऱ्यांनाच भिऊन न जातां जगांत वावरणारे जे असतात ते त्यांना युक्तीनें एका बाजूला सारूनच आपलें कार्य उरकवून घेतात त्याच-प्रमाणें मंदीराच्या दाराशीं असलेल्या पुजाऱ्यांवर विषारी शेषाचा कितीहि पगडा बसलेला असला तरी त्यांना न भितां जें आपलें कार्य युक्तीनें उरकवून घेतात तेच जगांत वावरूं शकतात आणि तेच जनता जना-र्दन असतातहि. परंतु जणूं काय पहारेकरांनाच भेटा-वयाचे आहे ह्मणून त्यांच्याच गोष्टी जे बोलतात आणि पुढें जाऊन आपलें कार्य उरकवून न घेतां पहारेकऱ्या-पासूनच परत येतात त्यांना जर जगांत वावरता येणें शक्य नाहीं तर पुजाऱ्यांच्याच गोष्टी बोलून भिऊन परत जाणाऱ्या भिऱ्यांनाहि जगांत कसें वावरतां येणार आणि तें जनता जनार्दन तरी मग कसें असणार ? असें प्रकार ज्याठिकाणीं मूर्तिपूजा होते अशा मंदि-रांतच फक्त होतात असें नाहीं तर इतर ठिकाणीं सुद्धां ज्या प्रसंगीं ईश्वराचें स्मरण केलें कीं तमोगुणी विषारी शेषाचा थैनाच सुरूं होणें साहजिक असल्यामुळें गोंधळ उडतो त्या प्रसंगीं होणाऱ्या गोंधळापासून जगांत वावर-

णाऱ्यांना किती तरी सांभाळून राहावें लागतें ? तरीपण शेषाच्या थैनाचांतच सामील होऊन जो सर्वांचा खेळ खंडोबा होतो आणि त्यायोगें शेवटीं जो प्रसंग येतो आणि फूट पडते तसा प्रकार ईश्वराचें स्मरण केल्यानें टळतो ह्मणूनच जगांत वावरणाऱ्यांना ईश्वराचें स्मरण केल्यानें मोठाच फायदा होतो यांत संशय नाहीं. मग ईश्वराचेंच स्मरण केल्यानें चार माणसाच्या घरांत सुद्धां असे फूट पाडणारे प्रसंग टळलेले जेव्हां दृष्टोत्पत्तीस पडतात तेव्हां जगांत जे वावरतात त्यांना ईश्वराचेंच स्मरण करणें महत्वाचें वाटून त्यांनीं जर अशी राक्षसी वेळ टाकली तर घरांत फूट पडण्यास कारण असणाऱ्या विषारी शेषाच्या तमोगुणाला नाहींसा करण्याकरितां ईश्वराचेंच स्मरण उपयोगी आहे असें ह्मटल्यावांचून कसें राहवेल ? नाहींतर घरांत जर तोंडाला तोंड लागलें आणि तमोगुणी शेषा[च्या]च पगडा सगळ्यावर बसला तर त्या घरांतील चारच काय पण दोन जीव जरी असले तरी त्यांना जगांत मग कसें वावरतां येणार ? आणि जगांत न वावरतां आल्यामुळें त्यांना मग जनता तरी कोण म्हणणार ? दृष्टीकोनामुळें मत

भेद झाल्यास ईश्वराचें स्मरण ठेवल्यानें तमोगुणी-प्रकार घडणें शक्य नसल्यामुळें एका घराची जरी दोन घरें झालीं तरी त्यांच्यांत कुतरओढ चावाचावी कधींहि होण्याचा संभव नसतो म्हणूनच त्याचाहि जनतेतच समावेश झाल्याशिवाय राहत नाहीं. मग अशा जनते-मध्यें कोण कोणाला लावून बोलणार ? आणि ते वेगळे जरी राहत असले तरी त्यांना त एकत्र नाहींत असें कोण म्हणणार ? असें असल्यामुळेंच ज्याप्रमाणें ईश्वरानें त्याच्या बरोबर सतत राहणाऱ्या शेषाला अंगा खालीं दाबून त्यावर शयन केलेलें आहे त्याचप्रमाणें जगांतहि शेषाची तमोगुणी परम्परा सतत राहणारी जरी असली तरी तिला युक्तीनेंच बाजूला सारून जगांत वावरणारी जनताहि जनार्दनाप्रमाणें असल्याकारणानें अशा जनते-कडूनच जगाचीहि वाढ होत आहे. म्हणूनच ईश्वरा-पासून निर्माण झालेल्या जगाची जी वाढ होत आहे तिला कारण असलेल्या जनतेमध्यें जे जीव आहेत ते ज्या आश्रमांत आहेत त्या आश्रमालाच जगांत तरी महत्व आल्यावांचून राहत नाहीं. मग जगाचा जंगल न होतां वसाहत करण्यानेंच जर जगाची वाढ होते तर

त्या वाढीस कारण असलेल्या गृहांना आणि जे गृहांची काळजी घेतात अशा गृहस्थांना जगांत तरी महत्व असल्या-शिवाय जग कसें चालणार ? म्हणूनच गृहांची वाढ होणें ऐपतीवर अवलंबून असल्यामुळें ज्या आश्रमांत असतांना ऐपतीची वाढ होतें आणि ऐपत वाढविण्या-करितां कारण असलेलीं कर्में करण्याचें सामर्थ्य अंगांत असतें तो आश्रम चार आश्रमापैकीं एक असल्यामुळें त्या आश्रमाला गृहस्थाश्रम म्हणणें ओघानेंच येतें. मग अशा गृहस्थाश्रमाला जर जगांत वावरणारे मान्यता दर्शवित असले आणि जगांत न वावरणारे म्हणजे जगाशी फटकून वागणारे साधु सुद्धां गृहस्थाश्रमांत असलेल्या गृहस्थांना आशीर्वाद देत असले आणि भोंदू-हि त्यांना फसविण्याकरितां वाटतील तसें चकवाचकवी-चे खेळ खेळत असले तर त्यांत आश्चर्य कसलें ! आणि असें प्रकार रोज प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीस पडत असतांना संशय तरी कोणाला येणार ? साधू जंगलांत जरी राहतात तरी गृहस्थांनीं दिलेलें दूध ते घेतच नाहींत असें नाहीं. भोंदूंचे प्रकार तर विचारात्र्यासच नकोत. कारण बोलतांना अघळपघळ साधूंच्या गोष्टी आणि

हात पहावा तर नेहमीं पुढें आणि कांहीं न मिळालें तर राहूंच द्या ? पण त्यांच्या मना जोगे न मिळालें तर रागावण्याकरितांहि उशीर नाहीं. आणि हा सगळा राग येऊन जाऊन गृहस्थावर ! आणि जे गृहस्थाश्रमांत असतात त्यांच्यावर तर सगळ्यांचाच डोळा ! असें जगांत प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीस पडतें तर ज्या कर्मयोगामुळें गृहस्थाश्रम सर्वांना उपयोगी पडतो त्या कर्म योगालाच जर जगांत जास्त महत्व असलें तर त्यांत आश्चर्य कसलें ? आणि भगवान श्रीकृष्णांनीं जर गीता सांगून जगांत कर्मयोगच श्रेष्ठ आहे हें ठरविलें आणि त्याचेंच रहस्य सांगणारेहि जर लोकमान्य झाले तर ईश्वराचें वास्तव्य कर्म योगाचेंच ठिकाणीं असून गृहस्थाश्रमांत असणाऱ्या जनता जनार्दनावर सर्वांचीच भीस्त असल्यामुळें अशा जनता जनार्दनाला विषारी शेषानें कितीहि जंग जंग पछाडलें तरी काय होणा ? आणि त्यामुळें त्यांनाहि भीति तरी कशी वाटणार ! आणि कां वाटावी ! अशा प्रकारें कर्मयोगावरच जगाची वाढ होणें अवलंबून असल्यामुळें तें ईश्वरालाहि रुजूं होणें साहजिकच आहे.

ज्या हाताला दहा अंगुल्या आहेत त्या हातानेंच कर्में घडतात ह्मणून सगळ्या जगाला ईश्वरानें जरी व्यापलेलें असलें तरी ईश्वर दशांगुलीच उरलेला आहे आणि त्या मुळेंहि कर्मयोगच श्रेष्ठ आहे असें म्हटल्या वाचून राहवत नाहीं, आणि हें पटतेंहि. ह्मणूनच सकाळीं उठ-ल्याबरोबर हातांचें दर्शन घेऊन मग सूर्यनारायणाला हात जोडून जर नमन केलें तर त्या हातांनीं पुढें दिवस-भर चांगलीं कर्में घडत राहणें साहजिक असल्यामुळें कर्मयोगाच्या ठिकाणीं ईश्वराचें वास्तव्य नाहीं असें कोण म्हणेल? नैसर्गिकधर्म आणि नैसर्गिकजाति ज्यांना मान्य आहेत त्यांनीं मूर्तिपुजा म्हणून सूर्यनारा-यणाला नमन करणें आणि स्नान करून त्याला नम-स्कार घालणें जसें स्वाभाविक आहे त्याचप्रमाणें नैस-र्गिकधर्म आणि जाति ज्यांना मान्य नाहींत त्यांना मूर्तिपूजा वर्ज असली तरी त्यांच्या कडूनहि ईश्वराची प्रार्थना सूर्यनारायणाच्याच दिवशीं म्हणजे रविवारीं होतांना जेव्हां दृष्टीस पडतें तेव्हां त्यायोगें सूर्यालाच महत्व आहे असें वाटल्या वाचून राहत नाहीं. म्हणूनच जगांत वावरणाऱ्यांना मग ते कोणत्याहि धर्माचे असोत

जगांत कर्मयोगच श्रेष्ठ आहे ह्याचीच पूर्णपणें खात्री पटते आणि त्यामुळेंच पूर्व कर्मानुरूप फलें मिळतात ह्याची जाणीव झाली ह्मणजे त्यांना जन्मसिद्ध हक्काची जाणीव होते आणि जे जन्मापासून जन्मसिद्ध हक्काची जाणीव ठेवतात ते जगांत वावरतातहि आणि जनता जनार्दन होतातहि. मग अशा जनता जनार्दनाला जगाची वाढ करण्याकरितां कारण असलेल्या घरांची वाढ करणें जरूरीचें वाटल्याशिवाय कसें राहणार ! आणि घरांची वाढ करणें ऐपतीवर अवलंबून असल्यामुळें ज्या आश्रमांत ऐपतीची वाढ होते आणि ऐपत वाढविण्याची शक्ति असते त्या आश्रमाकडे त्यांचे जर लक्ष लागलें तर त्यांत आश्चर्य कसलें ? म्हणूनच गृहाकडे लक्ष ठेवणाऱ्या गृहस्थाकडें लक्ष जाऊन ते ज्या आश्रमांत असतात त्या गृहस्थाश्रमाची मर्यादाहि वयाच्या २६ वर्षांपासून तें ५५ वर्षांपर्यंत असली तरी त्या आश्रमांत असलेल्या जनतेकडे सर्वांचे लक्ष जाते आणि त्या आश्रमांत असलेल्या जनता जनार्दनावरच सर्व जगाची भिस्त असते ह्यांत संशय नाहीं. मग अशा जनता

जनार्दनांनीं घरांची काळजी घेतली तर ते जगाला पट-ल्याशिवाय कसें राहणार ? आणि परोपकाराच्या नांवा-खालीं जे घरावर तुळशीपत्र ठेवतील त्यांना जगांतसुद्धा वावरतां येणें शक्य नसल्यामुळें अशा मोकाट घरांत दुसरे घुसले तर त्याला ईश्वरानें तरी काय करावे ? आणि परोपकारार्थ घरावर तुळशीपत्र ठेवलेलें असल्या-मुळें एका तोंडानें परोपकाराचे ध्येय प्रकट केल्यानंतर त्यांनीच पुन्हां घरांत दुसरे घुसले म्हणुन ओरड करणें म्हणजे परोपकाराची दुसऱ्या तोंडाने धिंड काढल्या सारखें होऊन ही दुतोंडीं इच्छा होणें विषारी शेषाच्या झांपडीत सापडल्यानेंच झाली असें जर जगात वावरणा-ऱ्यांनीं म्हटलें तर तें पटत नाहीं असें जनतेपैकीं कोणा-लाहि म्हणता येणें कसें शक्य असणार ? जनता जना-र्दनाला तरी दुतोंडी वर्तन पटत नाहीं खास. म्हणूनच जगाचा जंगल न होतां आणि जगाची राख रांगोळीहि न होतां जग एकसारखें वाढतच आहे आणि वाढत आहे म्हणूनच तें जग आहे आणि जगांत जनता जना-र्दन असल्यामुळें झोंपड्यापासून महालापर्यंत निरनि-राळ्या प्रकारचीं गृहेंहि दृष्टोत्पत्तीस पडतच आहेत

आणि अशा प्रकारें होणारी वाढ ऐपतीवर अवलंबून असल्यामुळें ऐपतीची वाढ ज्या योगानें होते त्याला कारण कर्मयोग असल्यानें कर्म करण्यांत ज्या अर्थी समता नाहीं त्या अर्थी जगांत वावरणाऱ्यांत समता राहणें जरी शक्य नसलें तरीं केलेल्या कर्मांचीच फळें मिळतात ह्याची जाणीव असल्यामुळें झोपडींत राहणारा जितकी काळजी आपल्या झोपडीची घेतो आणि त्याला स्वतःच्या झोपडीचा जितका आनंद वाटतो तितकीच काळजी श्रीमंतांनाहि आपल्या गृहांची असते असें जेव्हां पाहण्यांत येतें तेव्हां कर्माप्रमाणें फळें मिळतात ह्याची जे जाणीव ठेवतात त्यांच्यांत एकसारखीच जाणीव असल्यामुळें समताच आहे असेंहि वाटल्यावाचून राहत नाहीं. कारण जगांत वावरणारे इतरांकडे पाहून हळहळत न बसतां त्यांना जी स्थिति प्राप्त करून घेण्याची इच्छा असेल ती स्थिति प्राप्त करून घेण्याकरितां जीं कर्में करावीं लागतात तीं कर्में करण्याकडे त्यांची प्रवृत्ति असलेलीच दृष्टोत्पत्तीस पडल्याशिवाय राहात नाहीं. मग जगांत वावरणारे प्रथम गरीब जरी असले तरी ते पुढें

कर्मं करून श्रीमंत झाल्याशिवाय कसें राहणार ? आणि शाद्बिक समतेच्या नांवाखालीं श्रीमंत जर गरीबासारखें राहूं लागलें तर त्यायोगें गरिबांची दैनातरि कशी नाहीं-शी होणार ? आणि श्रीमंताचीही अशी गरिबी जगाची तरी वाढ कशी करूं शकणार ? जगांत सर्व कांहीं ईश्वरानें देऊन ठेवलेलेंच आहे आणि विषारी शेषाच्या प्रभावामुळें त्याचीहि जगांत छाया पडलेलीच आहे आणि असें जरी असलें आणि दूध व मदीरा हे दोन्हीहि पदार्थ जगांत वावरतांना जरी समोर दिसले तरी ज्याअर्थी दुधाचा अंगिकार केल्यानें अंगांत शक्ति वाढून त्यायोगें जशी जगाची वाढ होते त्याप्रमाणें मदिरेचा अंगिकार केल्यानें जगाची वाढ न होतां उलट असलेल्या धराची सुद्धां नासधूस होऊन जातें त्या-अर्थी जगाची वाढ करण्यास कारण असणाऱ्या दुधावर ईश्वराचा प्रभाव आहे ह्याची जशी खात्री पटते, मग त्याचप्रमाणें मदिरेवर विषारी शेषाचा प्रभाव आहे ह्याचीहि खात्री पटतें मग जगांत कितीहि निरनिराळे प्रकार दृष्टोत्पत्तीस पडत असले तरी त्या सर्वांवर एकट्याचाच प्रभाव नसून

कोठें ईश्वराचा प्रभाव आहे आणि कोठें शेषाचा प्रभाव आहे ! हे समजणें जगांत वावरणाऱ्यांना तरी कसें कठीण असणार ? आणि शेषाची परम्परा वाढीस लावणाऱ्यांनीं कितीहि झांपड घालून तमोगुणी प्रकार सुद्धां ईश्वर निर्मीतच आहेत असें जरी सांगितलें तरी ते जगांत वावरणाऱ्या जनता जनार्दनाला तरी कसें पटणार ? अशा प्रकारें जगांत चांगलें आणि वाईट असे दोन्हीहि प्रकार दृष्टोत्पत्तीस पडत असल्यामुळें ईश्वरा बरोबर विषारी शेष आहे त्याची जेव्हां खात्री पटते तेव्हां शेषाच्या प्रभावामुळें उत्पन्न होणाऱ्या तमोगुणा-पासून वाटणारी भीति नाहींशी होण्याकरितां ईश्वराचें स्मरण उपयोगीं पडून कर्मयोगाकडे जेव्हां लक्ष जातें तेव्हां जगांत वावरणारे भाग्यवंत होतातहि. मग जसें कर्म तसें फल मिळत असल्यामुळें भाग्यवंत होणें कर्मावरून ठरतें हें पटत नाहीं असें जर कोणी ह्मणत असेल तर असें ह्मणणाऱ्यांना जगाची माहिती आहे असें तरी कसें ह्मणतां येईल. कर्मं करणारेच भाग्यवंत होतात आणि भाग्यवंत असतात ते कर्म केल्याशिवाय भाग्यवंत झालेले नसतात खास. ह्मणूनच जगांत कर्म-

योगाला महत्व आहे आणि ईश्वरानें प्रत्येक अवतारांत जीं कर्मे केली तीं कर्मे थोडक्यांत आठवून ईश्वराचें स्मरण ज्या भूपावळींत केलेलें आहे अशी अवतार भूपावळी ह्मणावयास जेव्हां जगांत वावरणारे संत जनतेला सांगतात तेव्हां त्यायोगें कर्म योगाचेंच रहस्य पटल्याहिशिवाय राहत नाहीं. मग नुसते हरी हरी ह्मणून ईश्वराचें स्मरण न करितां अवतार भूपावळी म्हणून जर ईश्वराचें स्मरण रोज प्रातःकाळीं केलें तर दिवसभर कर्मे करीत असतांना विषारी शेषानें आपला प्रभाव दाखवून कितीहि भीति दाखविण्याचा प्रयत्न केला तरी ईश्वराचें स्मरण केल्यानें सर्व प्रकारचे भवभय नाहींसे होऊन त्यायोगें भवसंदेह फिटल्याशिवाय कसा राहणार ? आणि भवसंदेह फिटून कर्मयोगाकडे लक्ष लागलें म्हणजे तें कलंकी अवताराच्या ध्येयालाच अनुसरून आहे असें कोण म्हणणार नाहीं ? अशा प्रकारें ईश्वराचें स्मरण केल्यानें भवभय हरण होत असल्यामुळें कर्मे करतांनाच भवसंदेह फिटतो असें नाहीं तर इतर वेळेसहि विषारी शेषानें घरांत प्रवेश करून धाकट्या मुलांबाळांकडून अपमान करविण्याचा प्रसंग जरी आणला

तरी सुद्धां अशा प्रसंगींहि ईश्वराचें स्मरण केलें म्हणजे भवसंदेह फिटल्याशिवाय राहत नाहीं. मग अशा रीतीनें भवभय हरण होऊन भवसंदेह फिटल्यानंतर कर्में करीत असतांना कितीहि त्रास झाला तरी प्रथम जितका ज्यास्त त्रास सहन करावा लागतो तितकेंच पुढें ज्यास्त सुख प्राप्त होत असल्यामुळें कर्में करतांना त्रास होतो असें जगांत वावरणाऱ्यांनीं म्हणणें कसें शक्य असणार ? आणि त्रास होतो असें जे म्हणतात त्यांच्या असें म्हणून त्रास टाळण्यानें जर पुढें प्राप्त होणारें सुखहि टळलें तर त्यांत आश्चर्य कसलें ? कर्में करीत असतांना तर राहूंच द्या ! पण खाण्यापिण्यांत आणि राहण्यांत सुद्धां श्रीखंड खाणारा श्रीखंड घोंट-ण्याचा त्रास होतो अथवा घरांत राहणारा गृहस्थ घर बांधतांना त्रास होतो असें कसें म्हणणार ? म्हणूनच जगांत वावरणारे त्रासाला कधीं न कंटाळतां आश्रमा-नुरूप कर्में करीत असतात म्हणजे विद्यार्थी असतांना विद्यार्जनाकडे लक्ष ठेवितात आणि गृहस्थाश्रमांत अस-तांना गृहस्थाश्रमांतील कर्में करितात आणि "कामांत कामा भज रामनामा" त्याची त्यांना जाणीव असल्या-

मुळें केलेल्या कर्माप्रमाणें कर्माचीं फळेंहि भोगण्याकरितां ते तयार असतात. मग केंव्हां कर्में आपण होऊन ईश्वराला अर्पण केलीं नाहींत तरी तीं कर्में केव्हांही ईश्वरापासून लपवून ठेवणें शक्य नसल्यामुळें जर जन्मापासूनच दुःख भोगावें लागलें तर त्याचा बोल ईश्वराकडे कसा राहणार ? जगांत वावरणारे कधीं ईश्वरावर बोल ठेवून दुःख झालें म्हणजे असें दुःख होणें ईश्वराच्या नांवाला काळोमा आणणारें असून त्याला दयामाया नाहीं असें म्हणत नाहींत इतकेंच नाहीं तर ईश्वरानें जगांत सर्व कांहीं देऊन ठेविलेलें असल्यामुळें सुख आणि दुःख भोगण्याची जबाबदारी सर्व प्रकारें ज्याची त्याच्यावर आहे ह्याची जाणीव ठेवून ईश्वराची जेव्हां प्रार्थना करतात तेव्हां ईश्वरा ! तूं धन्य आहेस आणि तुझी लीला अगाध आहे असें म्हणून केलेल्या कर्माप्रमाणें कर्माची फळे भोगावयास तयार आहोंत असेंच म्हटल्याशिवाय ते राहवत नाहींत आणि केलेल्या कर्माप्रमाणें स्वर्गसुख आणि नर्कवास भोगणें भाग असल्यामुळें तसें भोग भोगण्याकरितां ह्या जगांतच जन्मापासून दुःख दाखवून तूं जरी तसें भोग भोगणें भाग पाडिलेस

तरी त्याबद्दल तुला कांहींहि म्हणावयाचें नसून जर तुला कांहीं मागावयाचेंच असेल तर अशा स्थितींतहि जन्मास घालतांना पुढील कर्मे चांगलीं घडावीं ह्या हेतूनें असा योग येण्याकरितां सुज्ञ मंडळीसारख्या संतांची संगत ज्या ठिकाणीं मिळेल, अशा ठिकाणीं तरी जन्मास घाल! एवढेंच मागणें मागितल्याशिवाय ते राहात नाहींत. अशा प्रकारें जगांत वावरणारे ईश्वराची प्रार्थना करतात म्हणून मीहि तशीच ईश्वराची प्रार्थना मनोभावें करून आणि अवतार सुफळो ह्मणून कर्म करावें ह्या हेतूनेंच मी आतां आपल्या नियोजीत विषयावरील लेखाकडे वळण्याची परवानगी घेतों आणि लेखाला प्रारंभ करण्यापूर्वीं जर कशाची आठवण होत असेल तर जगांत वावरतांना कर्मांनीं दुःखदायक फल मिळाल्यास "विचार अमुचे ढळले देवा, कर्मशुद्ध नाहीं। दैवदशा फिरली ह्मणूनि बोल न तुज कांहीं॥" ह्या उक्तीची जशी आठवण होते त्याचप्रमाणें कर्मांतीं फल सुखदायक मिळाल्यास ईश्वराचें स्मरण करीत असतांना प्राप्त झालेल्या फलाच्या मानानें फलांशाचा नैवेद्य कितीहि थोडा असून सव्वा पैशाची खडीसाखर

जरी असली तरी तो नैवेद्य प्रथम ईश्वराला अर्पण करण्याची आठवण होणें साहजिक असल्यामुळें त्या नैवेद्याच्या प्रसादानें ईश्वराचाच अंश धारण करणाऱ्या इतर जिवांचें तोंड प्रथम गोड करण्याचीहि आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं.

दा. क्र. २८०६



" गच्छति इतिजगत् " म्हणूनच तें जग असल्या-
मुळें जगाचें पाऊल ज्याप्रमाणे मागें न जातां पुढेंच
पडत आहे त्याप्रमाणें जें जें कांहीं म्हणून जगांत दृष्टो-
त्पत्तीस पडतें त्या सर्वांचे पाऊल पुढेंच पडत असल्या-
मुळें जगाची एक सारखी वाढच होतांना दृष्टोत्पत्तीस
पडत आहे. म्हणूनच रोपापासून पुढें जसें झाड
झालेलें दृष्टोत्पत्तीस पडतें त्याचप्रमाणें मनुष्यरूपांतही
बाळपणानंतर वृद्धावस्थाच आलेली दृष्टोत्पत्तीस पडते
आणि ज्याअर्थी वाढीस लागून कोंफावत जाणाऱ्या
झाडाची वाढ झाडाच्या मुळाशीं ओलावा असे तोंपर्यंत
होत जाणार त्याची खात्री पटते त्याअर्थी जगाची वाढ

श्री



# गृहस्थाश्रम.

होतांना पाहून मुळाशी असलेल्या ओलाव्याची जाणीव यावत् चंद्रदिवाकरौ राहणारी असल्यामुळें जगाची वाढ होतच जाणार ह्याची खात्री पटते. जगांत जें एकदां प्रथम दिसते तसेंच तें पुढें पूर्ववत दिसत नसून वाढी-मुळें त्याच्या स्वरुपांत अंतर पडलेलें दिसतें ह्मणून जगाची वाढ होतांना जगाला असणारी गति चक्रा-सारखी गरगर फिरणारी अथवा रहाटगाडग्यासारखी नसून पुढेंच जाणारी आहे हें कसाहि विचार केला तरी पटल्याशिवाय राहत नाहीं. मग जगांत वावरणाऱ्यांना वाढीस लागलेल्या जगाच्या गती बरोबरच पुढें गेल्या-शिवाय जगांत तरी वावरतां येणें कसें शक्य असणार ? आणि जर कोणी मागें जाण्याचाच प्रयत्न जबरदस्तीनें करूं लागला तर त्याला जगहि मागें जाऊं न देतां पुढेंच ओढीत नेल्याशिवाय कसें राहणार ? बाळपण चांगलें असतें म्हणून दाढी मिशी आलेला मनुष्य जर बाळलीलाच करून जगांत वावरूं लागला आणि आयते घांस तोंडांत पडतील अशी लहान मुलांप्रमाणेंच अपेक्षां करूं लागला तर त्याला जगांत वाव मिळणें शक्य नसल्यामुळें जेव्हां शेवटीं भुकेला राहण्याचा प्रसंग येतो

तेव्हां पुढें काबाड कष्टाची कामें करून भूक शमवावी लागली ह्मणजे मागें जाणाऱ्यांना जग पुढें जाण्यास कसें भाग पाडतें हें दिसत असल्यामुळें जगांत पुढें गेल्या शिवाय गत्यंतरच नाहीं हें पटतें. मग प्रथम मागें जाऊन नंतर पुढें फरफटत जाण्यापेक्षां प्रथमच पुढें जाणें बरें आहे असे जगांत वावरणाऱ्यांना तरी वाटल्या-शिवाय कसें राहणार ? आणि त्यांना असें वाटतें आणि पटतें ह्मणूनच तेहि जगाच्या वाढीबरोबरच पुढें जात असल्यामुळें त्यायोगे जगाचीहि वाढ होत असून सर्व जगाचें लक्ष त्यांच्याकडे जात असल्यामुळें त्यांना जनता जनार्दनाची मान्यताच मिळते आणि अशाच जनता जनार्दनाकडून सर्वांना कोणत्यानां कोणत्या तरी प्रकारे वर्गणीच्या रुपानेंहि सहाय मिळतेहि. ह्मणूनच ज्या अर्थीं जगाची एक सारखी वाढ होत आहे आणि जगांत जे वावरतात ते एकमेकांना सहाय करीत आहेत त्याअर्थीं जगांत जनता जनार्दन जागृत आहे हें पटल्या-शिवाय राहत नाहीं खास.

अशाप्रकारें जगांत जनता जनार्दन जागृत आहे ह्याची जाणीव होत असल्यामुळें नर करणी करून

नराचा नारायण होतो हें जगांत वावरतांना दृष्टोत्पत्तीस पडते तेव्हां कर्म करणारे नर जनता जनार्दन आहेत ह्याची जाणीव होऊन ज्या आश्रमांत असतांना कर्म करण्याचें सामर्थ्य विशेष असतें आणि त्यायोगेच इतर आश्रमांत जे असतात त्यांनाहि कर्म करण्याकरितां प्रोत्साहन मिळतें अशा आश्रमाकडे लक्ष गेलें ह्मणजे गृहस्थाश्रमांतच वावरणाऱ्या जनता जनार्दनाची जाणीव होऊन चारीहि आश्रमांत गृहस्थाश्रमच महत्वाचा आहे ह्याची खात्री पटते. मग जगांत जंगल न वाढतां जगाची वाढ गृहामुळेंच होत असल्यामुळें गृहाची वाढ करून वसाहत वाढविणारें गृहस्थ आणि ज्या ऐपतीमुळें गृहाची वाढ होते ती ऐपत संपादन करण्याची शक्ति आणि गृहांना सांभाळण्याचें सामर्थ्य ज्या आश्रमांत असतें तो गृहस्थाश्रम जगांत वावरतांना तरी सर्व प्रकारे श्रेष्ठ आहे असें कोण ह्मणणार नाहीं ? म्हणूनच जगांत वावरतांना गृहस्थाश्रमांतच असणाऱ्या जनता जनार्दनाची जाणीव होऊन जगाची सगळी भिस्त त्याच जनता जनार्दनाकडे असल्यामुळें जगाची ज्याअर्थी वाढ होत आहे त्या अर्थी गृहस्थाश्रमांत असणारी जनता जागृत असून त्या

ठिकाणीं जनार्दनाचेंच वास्तव्य आहे हें कसाहि विचार केला तरि पूर्णपणें पटल्या शिवायहि राहत नाहीं. असें प्रत्यक्ष दिसत असून जर तें पटत नाहीं असेंच ह्मणण्याचा कोणी आग्रह धरिला तर असें ह्मणणाऱ्यांना जगाची माहिती आहे असें तरी कसें ह्मणतां येणार ? आणि त्याला जगानें तरी काय करावे ? जग जोंपर्यंत चाललेलें आहे आणि पुढें जात आहे ह्मणूनच तें जग आहे तोंपर्यंत जगाची भिस्त गृह आणि गृहस्थाश्रमांत करावी लागणारीं कर्मे ह्यांच्यावर राहून त्याच ठिकाणीं ईश्वराचें वास्तव्य असल्यामुळें त्याच जनता जनार्दनाकडे जगांत जे वावरतात त्यांचें लक्ष सतत राहणारें आहे यांत संशय नाहीं.

जगांत जें जें कांहीं दृष्टोत्पत्तीस पडत आहे त्या सर्व प्रकारांत एक सारखी वाढच होत असल्यामुळें रूपांतरान्वयें प्राप्त झालेल्या मनुष्यरुपांतहि वाढ होत जाऊन त्यांत कितीतरी जाति दृष्टोत्पत्तीस पडत आहेत ! ज्यांनीं नैसर्गिक धर्म मान्य असल्यामुळें जाति मानल्या आणि कृत्रिम धर्माचीहि स्थापना करून कांहींनीं जाति जरी न मानल्या तरी मनुष्य रूपांत जन्माला येणाऱ्या सर्व

जिवाचें पूर्णायुष्य शंभर वर्षांचें आहे हे सर्वांनाच मान्य झालेलें आहे यांत संशय नाहीं. ह्या पूर्णायुष्य असलेल्या शंभर वर्षांच्या अवधींत जिवांना चार आश्रमांतून जावें लागतें. पहिल्या आश्रमाची मर्यादा पंचवीस वर्षांची असली तरी पहिली बाळपणची पांच वर्षें सोडून दिलीं ह्मणजे वीस वर्षांचीच मर्यादा विद्यार्जना-करितां उपयोगी पडते. दुसऱ्या आश्रमाची मर्यादा तीस वर्षांची असून हाच काळ तरुणपणाचा असल्या-मुळें त्या आश्रमाला विशेष महत्व येतें. पुढील काळांत जे दोन आश्रम क्रमावयाची असतात त्यांत पहिलीं वीस वर्षें तिसऱ्या आश्रमाची असून शेवटल्या चौथ्या आश्रमाची मर्यादा पंचवीस वर्षें जरी असली तरी शेवटलीं पांच वर्षें पहिल्या पांच वर्षांप्रमाणेंच निरुपयोगी असतात. अशाप्रकारें पहिल्या व तिसऱ्या आणि चौथ्या आश्रमाचीं मर्यादा प्रत्येकी वीस वर्षांची उपयोगी ठरून दुसऱ्या आश्रमाची मर्यादा तीस वर्षांची असल्यामुळें आयुष्याचा ज्यास्त काळ दुसऱ्याच आश्रमांत घालवावा लागतो आणि हाच काळ ह्मणजे सव्वीस वर्षांपासून पंचावन वर्षांपर्यंतचीच मर्यादा आजही

महत्वाची आहे असें जेव्हां दृष्टोत्पत्तीस पडते तेव्हां हाच आश्रम चारीहि आश्रमांत महत्वाचा आहे हें सिद्ध होते आणि त्याच आश्रमाला गृहस्थाश्रम म्हणतातहि. पहिल्या आश्रमांत असतांना विद्यार्जन करण्याकरितां जीं कर्मे करावीं लागतात तीं कर्मे करण्याकरितां दुसऱ्या आश्रमांत असलेल्या कर्मावरच अवलंबून राहावें लागत असल्यामुळें त्या गृहस्थाश्रमावर किती तरी जबाबदारी असतें आणि असें आहे म्हणूनच अशा गृहस्थांना जगांत किती तरी धोरण ठेवून राहावें लागतें ! आणि ते धोरण ठेवून राहतात म्हणूनच जगाचीहि वाढ होत आहे. मग गृहस्थाश्रमांत असणारे गृहस्थ फारच सावधगिरीनें वावरतानां जर जगांत दृष्टोत्पत्तीस पडलें तर त्यांत आश्चर्य कसलें ? असें गृहस्थ जगांत वावरतांना किती तरि आवधानें ठेवून सावध असलेली नजरेस पडतात ! तें आपलीं कर्मे करीत असतांनाहि चोहोंकडे त्यांचें लक्ष असतें. म्हणूनच अशा नानाविधानी गृहस्थाचें इतर व्यवहाराकडेहि किती तरी लक्ष असतें ! मुलांना खेळवितात म्हणूनच लहान मुलेंसुद्धां त्यांची वाट पाहत असतात. विद्यार्थीदशेंत असणाऱ्या विद्यार्थ्यांकडे

त्यांचें लक्ष असतें म्हणूनच विद्यार्थीहि त्यांच्या मदतीचीच अपेक्षा करीत असतात. गृहस्थाश्रमांत वावरणाऱ्या इतर मंडळींना मदत करण्याकडे त्यांचें लक्ष असतें म्हणून वेळप्रसंगीं एकमेकांची एकमेकांना मदत होतेहि. त्यांना स्वत्वाची जाणीव असल्यामुळें स्वधर्मानुरुप असलेले आचार विचार आणि परम्परा ह्याचें पालन करण्यांत लागणाऱ्या मनोधैर्याकडे त्यांचें लक्ष असतें. नैसर्गिक असलेल्या जन्मापासून जन्मसिद्ध हक्काचें पालन करण्यांत लागणाऱ्या मनोधैर्याकडे त्यांचें लक्ष असतें. नैसर्गिक दृष्ट्या पोषक असेल असेंच खाणें पिणें आणि राहणें कायम ठेवण्यांत लागणाऱ्या मनोधैर्याकडे त्यांचें लक्ष असतें. कर्में करीत असतांना कर्मवीराकडे जसें त्याचे लक्ष असतें त्याचप्रमाणें धर्माच्या बाबतींत धर्मवीराकडे त्यांचें लक्ष असतें. शास्त्री हरदास पुराणिक वगैरे धर्माभिमान्यांची संभावना करण्याकडे जसें त्यांचें लक्ष असतें त्याचप्रमाणें कर्मवीरांची संभावना करण्याकडेहि त्यांचें लक्ष असतें. नाटकें सिनिमा वगैरे तमाशेच नव्हे तर हलक्या प्रमाणावर असलेला गारुड्याचा खेळ सुद्धां

पाहण्याकडे त्यांचें जसें लक्ष असतें त्याचप्रमाणें किर्तन भजन वगैरे ज्या ठिकाणीं होतें अशा ठिकाणीं जाऊन ईश्वराचें नामस्मरण करण्याकडेहि त्यांचें लक्ष असतें. निरनिराळ्या हुन्नरामुळें जगाची वाढ होत असल्यामुळें किंमती सामान घेण्याकडे त्यांचें जसें लक्ष असतें त्याचप्रमाणें एक पैशाचें कागदाचें फूल सुद्धां घेण्याकडे त्यांचें लक्ष असतें. कादंबऱ्या वाचण्याकडे त्यांचें जसें लक्ष असतें त्याचप्रमाणें इतिहास पुराण वगैरे वाचण्याकडेहि त्यांचें लक्ष असतें. कोठें काय चाललें आहे हें समजावें ह्या हेतूनें निरनिराळीं मतें प्रतिपादन करणारीं वर्तमानपत्रें आणि मासिक पुस्तकें वाचण्याकडे त्यांचें लक्ष असतें. चांगलें आणि वाईट हे दोन्हीहि प्रकार जगांत असल्यामुळें कोणी कशीहि टीका करून आणि आपणच आपल्या कार्याला कितीहि मोठमोठालीं नांवे देऊन आपल्या कार्याची महति सांगताना जरी इतर कार्याची नालस्ती केली तरी चांगलें कार्य कोणतें आणि वाईट कार्य कोणतें हें शोधून काढण्याकडे त्याचें लक्ष असतें. " याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुरगुरायते " हें तत्व ठेवून जे दान

मागतात त्यांच्यापासून सावध राहून योग्य ठिकाणीं थोडाशा इषारावरच नव्हे तर न मागतांहि दान देण्याकडे त्यांचें लक्ष असतें. दयेला जो पात्र असेल त्याच्यावरच दया करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. कोणत्याहि बाबतींत मागें न जातां पुढें जाण्याकडे त्यांचें लक्ष असतें. मागें जाण्यानें पुनर्धारणा होत असल्यामुळें पुढें जाऊनच सुधारणा करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. झोपडीचें जर घर झालेलें असेल तर घराची पुन्हां झोपडी करून पुनर्धारणा न करितां घराची हवेली करून सुधारणा करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. दारिद्र्य असेल तर कर्मेंकरून श्रीमंत होण्याकडे त्यांचें लक्ष असतें. श्रीमंती असली तर श्रीमंतीची वाढ करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. निंदकाची टीका बेफाम जर असली तर त्या टीकेला युक्तीनें उत्तर देण्याकडे त्यांचें लक्ष असतें. दुटप्पी बोलणाऱ्यापासून सावध राहण्याकडे त्यांचें लक्ष असतें. आपल्या समोर इतरांची भलतीच कुचेष्टा करणारे इतरासमोर आपलीहि तशीच कुचेष्टा करणें साहजिक असल्यामुळें अशा कुचेष्टाखोर थट्टा करणाऱ्यांची संगत युक्तीनें टाळण्याकडे त्यांचें लक्ष असतें.

सरळरीतीनें वाद करावयाचा झाल्यास लेखींवाद करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. तोंडींवाद करणारे वादाला जेव्हां सुरुवात करितात तेव्हां वादांत महत्व आहे हें सिद्ध होत असून लेखी मागितले म्हणजे वाद महत्वाचा नाहीं असें म्हणून एका पळवाटीनें घसरून जाणारे आणि तोंडीं वाद करतांना अंगावर बाजू आली म्हणजे आपणच उलट रागावतां कां ? असें म्हणून दुसऱ्या पळवाटानें घसरून जाणारे दुतोंडी असल्यामुळें अशा पळवाटींच्या मागें लागणाऱ्याशीं युक्तीनें वाद करून त्यांना वाटेस लावण्याकडे त्यांचें लक्ष असतें. अतिपरिचय असलेल्या मंडळींशीं जितका वाद कमी करतां येईल तितका वाद कमी करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. वडील मंडळींशीं वाद करतांना त्यांचा आदर ठेवून वाद करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. धाकट्या मंडळींशीं वाद करतांना आपला आदर कायम राहील अशा बेतानेंच वाद करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. रागीट मंडळीशीं वाद करतांना फारच सावधगिरी ठेवण्याकडे त्यांचें लक्ष असत. होता होईल तोंपर्यंत रागीट मंडळीं-शीं वाद करण्याचें टाळण्याकडे त्यांचें लक्ष असतें.

रागीट मंडळीच्या कोणत्याहि कारभारांत न पडण्याकडे त्यांचें लक्ष असतें. जगाशीं फटकून वागून जगाला मिथ्या समजणारे साधु जंगलांत जाऊन तपश्चर्या करीत बसले तरी तशा अवघड ठिकाणींहि जाऊन त्यांची सेवा करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. साधू सारखा गोष्टी सांगून पुन्हां जगांत राहणाऱ्या आणि घोटाळा उडविणाऱ्या भोंदू पासून युक्तीनें सावध राहण्याकडे त्यांचें लक्ष असतें कांहीं कारणामुळें राग जरी आला तर तितक्या पुरतें रागावून इतर व्यवहार शांततेनें करण्याकडे त्यांचें लक्ष असते. ज्यांनीं ज्या विषयांत प्राविण्य मिळ-विलें असेल त्या विषयांतच त्यांचें कौतुक करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. रोगाशीं झगडतांना वैद्य आणि डॉक्टर ह्यांच्याकडे त्यांचें लक्ष असतें न्याया-च्या कचेरींत दाद लावून घ्यावयाची झाल्यास वकी-लाकडे त्यांचें लक्ष असतें. सार्वजानिक ठिकाणीं कर्मे करीत असतांना तेथें खांद्यास खांदा लावून कर्म करणारे कोणत्या धर्माचे आणि कोणत्या जातीचे आहेत हें पाहत न बसतां कर्म करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. बाजारांत भाजी संत्रे जांब वगैरे विकणारे कोण आहेत

हे पाहत न बसतां माल घेण्याकडे त्यांचे लक्ष असते. प्रवास करीत असतांना शेजारी कोण बसले आहेत हें बघत न बसतां प्रवास करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. कर्में करीत असतांना आपल्यापेक्षां श्रेष्ठ असलेले अधिकारी कोणत्याहि जातीचे असले तरी त्यांचा आदर ठेवण्याकडे त्यांचें लक्ष जसें असतें त्याचप्रमाणें आपल्यापेक्षां कनिष्ठ असलेले कोणत्याहि जातीचे अगर धर्माचे जरी असले तरी त्यांच्यावर प्रेम करण्याकडे त्यांचे लक्ष असते. ज्या ठिकाणीं ज्यांचा जसा अधिकार असेल त्या ठिकाणींच त्यांचा तसा अधिकार मानण्याकडे त्यांचे लक्ष असतें. " गर्जेल तो पडेल काय आणि बोलेल तो करील काय ! " ह्याची जगांत नेहमीं प्रचिती येत असल्यामुळें विद्यार्जनानें विद्वत्ता वाढून जिव्हाग्रीं वास करणाऱ्या सरस्वतीच्या प्रभावानें जिव्हा ज्यास्त बोलावयास लागली ह्मणजे कर्में करण्यास अडथळा येऊन लक्ष्मी अंतरणें साहजिक असतें म्हणून कर्में करीत असतांना जिव्हेला आटोक्यांत ठेवून विद्वत्तेचा उपयोग करण्याकडे त्यांचे लक्ष असतें. जे आतां आहे तें पूर्वी जसें होते तसें करून पुनर्धारणा न करतां सामाजिक

बाबतींत सुद्धां जगाच्या वाढीबरोबर पुढें जाणारी अशी जी चांगलेपणा आणणारी सुधारणा असते तीच सुधारणा पुढें रूढी होऊन शास्त्रांपेक्षांहि बळवान होत असल्यामुळें अशी सुधारणा करण्याकडे त्यांचें लक्ष असतें. जन्मापासून मरेतोंपर्यंत एकमेकांना एकमेकांची मदत घेतल्याशिवाय जगांत वावरतां येणें शक्य नसल्यामुळें जगांत कांहींहि प्राप्त करून घेतांना पारतंत्र्य जरी असलें तरी प्राप्त करून घेतल्यांनंतर त्याचा उपभोग स्वातंत्र्यांत घेण्याकडे त्यांचें लक्ष असतें. वाममार्गानें प्राप्त होणारी मिळकत वाम मार्गानेंच खर्च होणें साहजिक असल्यामुळें सरळ रीतीनेंच ऐपत वाढविण्याकडे त्यांचें लक्ष असतें. विश्वबंधुत्व, समता, आणि स्वातंत्र्य वगैरे सारख्या गोड लागणाऱ्या नांवाखालीं भपकींत जाऊन कांहीं एक न करतां इतरांच्या भरंवशावर आयतेच सुख प्राप्त होईल अशी भलतीच समजूत करून घेऊन नुसत्या मिटक्या मारीत न बसतां स्वकष्टार्जीत प्राप्त होणाऱ्या सुखाची जाणीव ठेवून जें सुख पाहिजे असेल तें सुख प्राप्त करून घेण्याकरितां जीं कर्मे करावीं लागतात तीं कर्मे करण्याकडे त्यांचें

लक्ष असतें. आपल्या मनाजोगें एखादें कार्य घडून येत नसल्यास ते कसें पाहिजे हें सरळ रीतीनें सांगून मनाजोगें करवून घेण्याकडे त्यांचे लक्ष असते. रिकामें राहिलें म्हणजे अथवा अकर्म कर्म घडलें म्हणजे कांहींहि फायदा होत नसल्यामुळें अंगांत सुस्ती चढून मन जेव्हां अगदीं हलकें होऊन जातें तेव्हां थोडासा आवाज झाला कीं डोकें भणाणतें आणि पायाची आग मस्तकांत चढून जो राग येतो तो विषारी शेषाच्याच परम्परेला अनुसरून असल्यामुळें तसे व्हावें ह्या हेतूनेंच जगाची वाढ करण्यास कारण असणारीं अशीं कर्में करून रिकामपणामुळें इतस्ततः भ्रमण करून रागीट होणाऱ्या मनाला गुंतवून ठेवण्याकडे त्यांचें लक्ष असतें.

अशा प्रकारें हजारों असलेले जगांत चालणारे सर्व व्यवहार करीत असतांना चोहोंकडील धोरण ठेवून मनाची चलबिचल न होऊं देतां जगांत वावरणारे गृहस्थाश्रमांतील गृहस्थ नानावधानी असल्यामुळें जो ज्या मानानें अवधानें ठेवून जगांत वावरतात ते त्याच मानानें जगाच्या वाढीस कारण होऊन जगांत जेव्हां सुधारणा होते तेव्हां अशा गृहस्थांकडून मुळांशी कारण

असणाऱ्या अशा गृहाचीहि वाढ होतें. असें असतांना आणि पक्षी सुद्धां आपल्या घरट्यांचा बंदोवस्त केल्याशिवाय राहत नाहींत असें दिसत असतानांच नव्हें तर ज्यांच्या जिवांत जीव आहे त्या सर्वांना आश्रयाकरितां छाया पाहिजेच असते असें दृष्टोत्पत्तीस पडत असतांना जगांत ज्यांना राहावयाचें आहे त्यांना मनुष्यरुपासारखें श्रेष्ठ असें उत्तम रुप प्राप्त झाल्यानंतर गृहांची काळजी घेतल्याशिवाय जगांत तरी कसें राहतां येणार ? मग जगांत ज्याठिकाणीं गृहाची काळजी घेतली जात नाहीं आणि गृह असलें तर गृहावर तुळशीपत्र ठेवण्याचें ध्येय ठेवून फकिरीलाच मोठी मान्यता दिली जाते त्या ठिकाणीं असें ध्येय ठेवणाऱ्यांचा वाढीस लागलेल्या जगाशीं संबंध आहे असें कोण म्हणेल ? आणि असें जर कोणी म्हटलेंच तसें म्हणणें जगाला जर रूजूं होणें शक्य नाहीं तर जगांत जे वावरतात त्यांना तरी तें पटणें कसें शक्य असणार ? घटकाभर थट्टामष्करी केल्यानें जरी मनोरंजन होत असलें अथवा प्रेत यात्रेबरोबर स्मशान भूमीकडे जातांना वेदांत उपयोगी पडत असला तरी

जगाशीं संबंध आला कीं जगांत वावरतांना थट्टा-मष्करी पळभर सुद्धां चालत नाहीं आणि वेदांतानें उत्पन्न होणारें स्मशान वैराग्य स्मशानांतच राहून जातें. ह्मणूनच पैशाची भाजी सुद्धां जगांत पैसा दिल्याशिवाय मिळत नाहीं आणि जर कोणी वेदांतच सांगितला आणि पैसा बरोबर येत नाहीं म्हणून सांगितलें तर भाजीसुद्धां खाण्यानें फायदा नाहीं असेंच वेदांतीं प्रत्युत्तर मिळालें ह्मणजे ह्मणणाऱ्याचेंच पाय म्हणणाऱ्यांच्याच गळ्यांत पडतात. असें असल्यामुळेंच जगांत वावरणारे जगाला रुजूं असेल अशाच प्रकारचे व्यवहार करून जगांत वावरतात म्हणून गृहस्थाश्रमांतील गृहस्थ गृहामुळेंच जगांत आहेत आणि त्या योगें त्यांच्याकडून गृहांची वाढ होऊन जगाचीहि वाढ होत आहे. अशा प्रकारें गृहाची वाढ करणारे गृहस्थ ज्या योगानें गृहांची वाढ होते अशीं कर्में करून गृहांची जेव्हां काळजी घेतात, तेव्हां अशा गृहस्थांच्या गृहांत इतरांनाहि घुसतां येणें शक्य नसते. आणि त्यांच्याकडून जेव्हां स्वार्थत्याग होतो तेव्हां त्यायोगें इतरांना मदत मिळून परमार्थ घडला म्हणजे गृहाचीच वाढ होत

जाते. मग विद्यार्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत केली ह्मणजे विद्यार्थी दशा संपल्यानंतर त्यांचा जेव्हां गृहस्थाश्रमांत प्रवेश होतो तेव्हां त्यांच्याकडून गृहांचीच वाढ होत असल्यामुळें विद्यार्थ्यांना मदत करण्यांत होणारा स्वार्थत्याग परमार्थ आहे असें कोण ह्मणणार नाहीं? जगांत जे वावरतात ते तरी अशा स्वार्थत्यागापासून परमार्थ होतो असें म्हणतात खास. ह्मणूनच गृहस्थाश्रमांतील गृहस्थ आपल्या गृहांची काळजी घेतात आणि जे त्यांच्या करितां झटतात त्यांच्याहि गृहांची काळजी घेतात तेव्हां जगाच्या कल्याणाकरितां झटणारेहि घरावर तुळसीपत्र ठेवण्याची भाषा बोलत नाहींत. मग जगांत ज्या ठिकाणीं गृहांची काळजी घेतली जाते त्याठिकाणीं त्यांच्या गृहांत कोण घुसूं शकणार! साधारण तट्टयाच्या झोंपडींत सुद्धां एखादा अशक्त असलेला म्हातारा थोडासा जर खाकरला आणि त्यानें जागें असल्याचें दाखविलें तर घट्टयाकट्टया माणसाची झोंपडींत शिरण्याची हिम्मत होत नाहीं. मग गृहस्थाश्रमांतील गृहस्थानीं जर आपलीं गृहें सांभाळलीं तर त्याच्या गृहांत शिरण्याची हिम्मत तरी

कोणाची होणार ? आणि असें असून जर कोणी आपलें गृह मोकाटच ठेविलें तर अशा मोकाट गृहांत वाटेल त्याला शिरतां येणें सहज असल्यामुळें आपलीं गृहें जें मोकाट ठेवितात त्यांना गृहस्थ म्हणून जगांत तरी वावरतां येणें कसें शक्य असणार ? जगांत ज्यांना वावरावयाचें असतें त्यांना तरी आपल्या गृहांची काळजी असते ह्यांत संशय नाहीं. म्हणूनच जगांत वावरणारे गृहस्थाश्रमांत असतांना ज्यायोगें गृहांची वाढ करतां येईल अशींच ऐपत संपादन करण्याकरितां किती तरी तत्पर असतात ! जगांत निरनिराळे प्रकार असल्यामुळें कितीतरीप्रकारें निरनिराळीं कर्में करून ऐपत वाढवितां येतें ! श्रीगजानन महाराजांनीं चौदा-विद्या आणि चौसष्ठ कला ह्यांचें ज्ञान जगाला जरी पूर्वी देऊन ठेविलेलें असलें तरी जगाच्या वाढीबरोबर त्यांचीहि वाढ होऊन आज कितीतरी प्रकारें विद्यासंपादन करून निरनिराळ्या कलेचें ज्ञान संपादन करून घेतां येतें. कोणतीहि विद्या संपादन करून कोणत्याहि कलेचें ज्ञान संपादन केले म्हणजे अंगीं जो गुण येतो त्या गुणावर लक्ष्मी

प्रसन्न होत होत असल्यामुळें जगांत जितके गुण आहेत त्या सर्व गुणांना कांचनामुळें आश्रय मिळतो ह्मणूनच " सर्वे गुण: कांचनमाश्रयंते " ह्या तत्वाची सत्यता पटते. आणि ज्याअर्थी पूर्व कर्मानुरुप एखाद्याला गर्भ श्रीमंतींत जन्म मिळून जन्मापासूनच स्वर्गसुख जरी मिळालेलें असलें तरी त्याला सुद्धां गृहस्थाश्रमांत असतांना जर एखादा गुण अंगीं नसला तर त्याच्याकडून भलतींच कर्मं होणें साहाजिक असल्यामुळें जवळ असलेल्या कांचनाची वाढ न होता उलट असलेलें कांचन सुद्धां नाहींसें होतें आणि त्यायोगें " दैव देतें आणि कर्म नेतें " ह्याची जशी प्रचिति येते त्याचप्रमाणें दारिद्र्यांत जरी जन्म झालेला असला तरी गृहस्थाश्रमांत असतांना गुणानुरुप कर्मं करून श्रीमंतहि होतां येते त्याअर्थी जगांत गुणालाच महत्व आहे हें पटल्याशिवाय राहत नाहीं. ह्मणूनच जगांत वावरतांना जवळ जी ऐपत असेल ती वाढविण्याकरितां आणि जवळ जर मुळींच ऐपत नसेल तर ती प्राप्त करून घेण्याकरितां जो गुण संपादन केला असेल त्या गुणानुरुप कर्मं करून जगांत जेव्हां रहावें लागतें तेव्हां अशीं कर्मं कर्माकरितां करावयाचीं

असल्यामुळें तीं कर्मे करित असतांना मित्रत्वाचें नातेंच नव्हे तर भाऊबंदांचेंहि नातें जर विसरावें लागतें तर शत्रुत्वाचें नातेंहि विसरल्याशिवाय जगांत कर्म करतां येणें कसें शक्य असणार? आणि कर्मे करीत असतांना अधिकारानुरुप एकमेकांना कमी अधिक मान्यता जरी असली तरी सर्वच कर्माचे नोकर असल्यामुळें कोण कोणाला आपला नोकर ह्मणणार! असें असल्यामुळेंच सर्व जरी कर्माचें नोकर असले आणि अशी नोकरीहि गुलामगिरी नसली तरी कर्मे करीत असतांना कर्माधिकाऱ्यांचा मान जसा श्रेष्ठ असतो त्याचप्रमाणें धर्माच्या बाबतींत धर्माधिकाऱ्यांचा मान श्रेष्ठ असतो. आणि कर्माधिकारी व धर्माधिकारी आपल्या निरनिराळ्या क्षेत्रांत श्रेष्ठ जरी असले तरी धर्माचरणामुळें शक्तीची वाढ होते म्हणून धर्माधिकारीहि कर्माधिकाऱ्यांचा जसा आदर ठेवितात त्याचप्रमाणें धर्माधिकारीहि कर्माधिकाऱ्यांचा गौरव करितात. मग ज्या कर्माच्या जोरावर ऐपतीची वाढ होऊन त्यायोगें जगाची वाढ होते तीं कर्मे करण्याकरितां लागणारी शक्ति जर धर्माचरणामुळें प्राप्त होते तर जगांत जे वावरतात त्यांचें लक्ष धर्माचरणाकडे लागल्या

शिवाय कसें राहणार ! आणि असें लक्ष लागलेलें असतें ह्मणूनच नैसर्गिक दृष्ट्या पोषक असेल असेंच खाणें-पिणें आणि राहणें ह्यासंबंधीं ते जेव्हां काळजी घेतात तेव्हां धर्म म्हणजे काय आणि धर्माचरण कसें असतें. हेंहि सांगतां येणें कठीण नसतें. कारण नैसर्गिक दृष्ट्या जें पोषक असेल असेंच खाणेंपिणें आणि राहणें ह्याबद्दल जे काळजी घेतात ते जसे शक्तीवान असतात त्याप्रमाणें त्याच्याविरुद्ध वर्तन करणारे शक्तीवान नसतात असेंच नेहमीं दृष्टोत्पत्तीस पडते मग नैसर्गिक दृष्ट्या मांसाहार ज्यांना पोषक आहे त्यांना जर सात्विक असलेला धान्याहार पचत नाहीं असें सिद्ध केलें जातें तर ज्यांचा जन्मापासून धान्याहार आहे त्यांना मांसाहार पचणें कसें शक्य असणार ? आणि मांसाहारानेंच फक्त शक्तीची वाढ होते असें जगांत वावरणारे तरी कसें म्हणू शकणार ? म्हणूनच जगांत ज्यांना वावरावयाचे असते त्यांना धर्म ह्मणजे काय आणि धर्माचरण कसें असतें ह्याची जाणीव असल्यामुळें त्यांच्यांत स्वधर्माभिमान असतो आणि त्यायोगेंच त्यांना जन्मापासून असलेल्या स्वत्वाचीहि जाणीव असते आणि अशा

प्रकारें ज्यांना स्वत्वाची जाणीव असते त्यांच्याकडून जगाची वाढ होत असल्यामुळें जसजशी जगांत गृहाची काळजी घेतली जाते त्याच मानानें जगांत श्रीमंतीचीहि वाढ होत जाते. मग ऐपतीप्रमाणें गृहांची जे वाढ करतात त्यांच्याकडून गृहाची वाढी करीत असतांना होणाऱ्या खर्चाला खर्च होतो असे जगांत वावरणारें तरी कसें ह्मणूं शकणार ? आणि असा होणारा खर्च जर व्यर्थ खर्च होत नाहीं तर त्यांना शोभा आणण्याकरितां लागणारा निरनिराळ्या प्रकारचा किंमती सामान घेतल्यानें निरनिराळ्या प्रकारच्या हुन्नरालाहि उत्तेजन मिळत असल्यामुळें त्यायोगें जगाच्याच वाढीस कारण असणाऱ्या अशा खर्चाला व्यर्थ खर्च आहे असेंहि कोण ह्मणूं शकणार ? अशा प्रकारें जगाच्या वाढीस कारण असणाऱ्या अशा खर्चाला जर व्यर्थ आहे असें म्हणतां येत नाहीं तर गृहांना ज्यायोगे ज्यास्त शोभा येते अशी गृहलक्ष्मी गृहांत जेव्हां येते तेव्हां अशा विवाह प्रसंगीं गृहिणीकरितां गृहस्थाकडून होणारा खर्च आणि पुढें होणारा गृहस्थ नवरदेव असून पुढें होणारी गृहिणी लक्ष्मी असल्यामुळें त्या प्रसंगीं

ईश्वराचा अंशधारण करणाऱ्या जितक्या ज्यास्त जिवांचें तोंड गोड करतां येईल तितक्या ज्यास्त जिवांचे तोंड गोड करण्याकरितां ऐपतीच्या मानानें होणारा खर्च व्यर्थ खर्च आहे असे जगांत वावरणाऱ्यांना तरी कसें ह्मणतां येणार ? म्हणूनच जगांत वावरणारे भलतीच समजूत करून घेऊन काटकसरीचा खर्च आकड्यानींच न ठरवितां ज्या ठिकाणीं जो खर्च करणें जरूर आहे तो खर्च करून जगाच्या वाढीस जसजसें कारण होत जातात तस तशीच जगांत श्रीमंतीच वाढ होत जाते. आणि एक मैल अंतरावर असलेल्या बाजारांत चार पैशाला मिळणारी भाजी जर घरा समोर पांच पैशांत मिळाली तर काटकसरीच्या खर्चाच्या मानानें आणि अर्थशास्त्रदृष्ट्या आंकड्यानें एक पैसा जरी ज्यास्त खर्च झालेला असला तरी जाण्यायेण्यांत जो वेळ खर्च होतो तितक्या वेळेत जर एखादें कर्म करून ज्यास्त ऐपत प्राप्त करतां आली तर एक पैशाचा ज्यास्त झालेला खर्च व्यर्थ खर्च होत नाहीं. ह्मणूनच जगांत जे गृहस्थाश्रमांत असतांना गुणानुरुप कर्मेकरून जी ऐपत प्राप्त होते त्या ऐपतीच्या मानानें सर्वांना उपयोगी

पडून आणि जगाच्या वाढीस कारण होईल अशा प्रकारचा खर्च करून आपल्या ऐपतीची जेव्हां वाढ करितात तेव्हां त्यांच्याकडून गृहांचीच वाढ होते. अशा प्रकारे गृहांची वाढ करणारे गृहस्थ ज्या आश्रमांत असतांना आपल्या ऐपतीप्रमाणें गृहांची वाढ करितात आणि गृहे सांभाळण्याचें सामर्थ्यहि ज्या आश्रमांत असतांना गृहस्थांना असतें त्या गृहस्थाश्रमाकडे सर्व जगाचें लक्ष असल्यामुळें आणि तिन्ही आश्रमांतलि कर्मे करणें त्याच गृहस्थाश्रमातील कर्मावर अवलंबून असल्यामुळें अशा गृहस्थाश्रमाला धन्य गृहस्थाश्रम असें जगांत वावरणाऱ्यांनीं जर म्हटले तर त्यांत आश्चर्य कसलें ? जगांत वावरणारे हें जाणतात म्हणूनच एखाद्या परिक्षेंत उत्तीर्ण होण्याकरितां एका विषयांत प्राविण्य जरी असले तरी इतर विषयांतहि उत्तीर्ण होण्याजोगी माहिती असणें जरूरीचे असतें त्याचप्रमाणें गृहस्थाश्रमांत वावरणाऱ्या गृहस्थांना जगांत गृहस्थ ह्मणून राहण्याकरितां एकाच विषयांत प्राविण्य जरी असलें तरी जगांत लागणाऱ्या इतर व्यवहाराचेंहि ज्ञान असणें जरूरीचें असल्यामुळें थोडें चुकले तर सर्वच

घसरते ह्यांचीहि जगांत वावरणाऱ्या गृहस्थांना जाणीव असते. मग एकाच विषयांत प्राविण्य मिळवून इतर बाबतींकडे दुर्लक्ष करणारे जगांत जर भटकूं लागलें तर त्याला कोणी काय करावें आणि हें जर जगाच्या वाढीस कारण होत नाहीं तर ते जगाला रुजूं नसल्यामुळें ईश्वराला तरी रूजू असणें कसें शक्य असणार ? आणि घर ना दार देवळी बिऱ्हाड असलें तर अशा मंडळींना गृहस्थाश्रमांत गृहस्थ ह्मणुन जगांत तरी कसें वावरतां येणार ? म्हणूनच गृहस्थाश्रमांत वावरणारे गृहस्थ गृहांची काळजी घेतात आणि त्यांना गृहाबद्दल मोठा अभिमान असतो. मग गृहासंबधानें जर कोणी कांहीं माहिती सांगितली तर ती त्यांना उपयोगी आहे असें वाटल्याशिवाय कसें राहणार ? ह्मणूनच गतवर्षी " गृह आणि गृहस्थ " ह्या लेखांत गृहाबद्दल जी माहिती दिलेली आहे त्याशिवाय आणखी ज्यास्त माहिती जर दिली तर ती गृहस्थांना उपयोगीच पडेल असें वाटणें साहजिक असल्यामुळें ह्या लेखाच्या मानानें जितकी माहिती देतां येईल तितकी माहिती सुद्धां त्यांना जगांत वावरतांना उपयोगी

पडल्याशिवाय राहणार नाहीं इतकेंच नाहीं तर जगांत कांहींहि प्राप्त करून घ्यावयाचें असल्यास तें प्राप्त करून घेण्यांत पारतंत्र्य असून प्राप्त झाल्यानंतरच त्याचा उपभोग घेण्यांत स्वातंत्र्य असल्यामुळें गृहाच्या कामांत सुद्धां बऱ्याच ठिकाणीं जेव्हां पारतंत्र्यांत राहून युक्तीनें कामें करवून घ्यावीं लागतात तेव्हां ही माहिती फायदेशीर झाल्याशिवाय राहणार नहीं आणि वाम-मार्गानें ज्यांना ऐपत प्राप्त होत असेल त्यांना जरी खर्चाची कदर नसली तरी सरळ मार्गानें ऐपतीची वाढ करणाऱ्या गृहस्थांची इच्छा, होणाऱ्या खर्चाचा मोबदला योग्य रीतीनें मिळण्याचीच नेहमीं असणे, साह-जिक असल्यामुळें अशा माहितीपासून थोडा तरी खर्चा-चाच बचाव झाल्याशिवाय राहणार नाहीं खास. ह्मणूनच खालील माहिती सांगाविशी वाटते. आणि तीन हजारा पर्यंत घर बांधावयाचें झाल्यास शेवटीं जो घराचा नक्षा दिलेला आहे त्या नमुन्यावर एक मजली घर बांधतां येऊन कमी अधिक ऐपतीच्या मानानें कमी अधिक मापें करून घर सोयीचे करतां येथें हेंहि सांगा-वेसें वाटतें.

———

# घर आणि घराची किंमत वगैरे माहिती.

गृहस्थाश्रमांत वावरणाऱ्या गृहस्थांना जगांत सत्तेची जागा असतेच आणि त्या ठिकाणीं गृहहि असतेंच. असें गृह असलें तरी त्या गृहाची वाढ करण्याकडे लक्ष नेहमी असून ऐपतीची वाढ जशी होत जाईल त्यामानानें गृहाची वाढ होत जाते तरी पण असलेल्या गृहाचीहि नेहमीं काहींना कांहीं तरी दुरुस्ती सुरूं असतेच आणि कामहि चाललेंच असतें. निदान बरसात लागण्याच्या अगोदर छावणीचें आणि बरसात संपल्यानंतर साफ सफाईचें काम. करणें जरूरीचे असल्यामुळें त्याहि वेळीं कमी अधिक कामें होऊन जातातच. सत्तेचें जर घर नसलें तर गृहाकडे लक्ष लागणें साहजिक असल्यामुळें गृहस्थाचें लक्ष नेहमीं जागा शोधण्याकंडें असून मनाजोगे एखादे आयतेच तयार अस- लेलें घर जर मिळाले तर तेंहि चांगलें असल्यामुळें तसें घर मिळविण्याकडे त्यांचें लक्ष असतें. असें आयतें घर विकत घेतांना फारच सावधगिरी बाळगावी लागते. कारण विकणारा वाटेल ती किम्मत सांगून जितकी ज्यास्त किम्मत मिळेल तितकी ज्यास्त किम्मत मिळविण्याची त्याची जशी खटपट सुरूं असते तशीच घेणारेहि उत्सुक असल्यामुळें कधीं कधीं वाटेल तशी किम्मत देऊन घर खरेदी करितातहि. तरीपण

असें आयतें तयार असलेलें घर योग्य किम्मतीचें आहे किंवा नाहीं हेंहि पाहणें जरूरीचें असतें आणि त्यायोगें देणाऱ्यांना आणि घेणाऱ्यांना अशा दोघांनाहि संशयांत राहून एकमेकांना फसविलें असें जें कधीं कधीं वाटतें त्याचाहि निकाल घराची योग्य किम्मत हिशेबानें जर काढली तर बरोबर लागतें ह्मणून असलेल्या घराची किम्मत हिशेबानें काढणें देणाऱ्यांच्या आणि घेणाऱ्यांच्या अशा दोघांच्याहि दृष्टीनें बरें असतें. जुनें घर जसें असेल तसेंच घर बांधण्या-करितां जी आज किम्मत लागते त्या किम्मतीतून जुनाट-पणाबद्दल प्रत्येक सहा वर्षाला शेंकडा पांच प्रमाणें किम्मत कमी करणें योग्य असतें. उदाहरणार्थः—एक हजार रुपयांत तीस वर्षांपूर्वी बांधलेल्या घराची आज किंमत किती आहे हें काढावयाचें झाल्यास त्या घराचें माप घेऊन तसेंच घर बांधण्याकरितां जर आज हिशेबानें दोन हजार रूपये लागतात तर त्या दोन हजारांतून सहा वर्षाला शेंकडा पांचप्रमाणें म्हणजे ( $२००० \times \frac{३०}{६} \times \frac{५}{१००} = ५००$ ) पां-चसें रूपये येतात ते जुनाटपणाबद्दल कमी केलें असतांना तीस वर्षांपूर्वी एक हजार रुपयाच्या किंमतीच्या घराची आज पंधराशें रूपये किंमत येते ती वाजवी असते. घर मजबूत असेल तर अशा प्रकारें किंमत लागते. घर मोड-कळीस जर आलें असेल तर त्या मानानें त्यांची किंमत

कमी करावी लागते. घराचे माप घेऊन निरनिराळ्या कामाचे जे भाव असतात त्याभावाप्रमाणें हिशेब केला म्हणजे जशी किंमत काढतां येते त्याचप्रमाण तशाच प्रकारचे घर जर नवीन बांधलेलें असेल तर त्याच्या खर्चाच्या मानानें जो हिशेब येतो त्यावरूनहि किंमत काढतां येते. जुनें घर जर अगदीच शिकस्त होऊन मोडकळीस आलें असेल तर तें पाडून नवे घर बांधणें बरें असतें. जुने घर पाडताना जो सामान निघतो त्यापैकीं पुन्हां उपयोगांत येण्याजोगा जो सामान असतो तो निराळा काढून ठेवणें बरें असतें. आणि दरवाजे खिडक्या आणि इतर लांकडी सामान चांगला असल्यास त्याला पुन्हां उपयोगांत आणणें फायदेशीर असल्यामुळें असा लांकडी सामान काढते वेळीं फारच सावधगिरी ठेवावी लागते. जुनें घर ज्या जागेवर असेल त्याच जागेवर नवें घर बांधवयाचें झाल्यास जुन्या घराचा पाया जर मजबूत असेल तर त्याचाहि जितका उपयोग करून घेतां येईल तितका उपयोग करून घेणें फायदेशीर असतें. पाया मजबूत नसल्यास तो जसा असेल तसाच त्या ठिकाणीं राहूं देऊन नवीन घराचा पाया ज्या ठिकाणीं पाहिजे असेल त्या ठिकाणीं खोदाई करणें बरें असतें. जुन्या घराचा पाया उपयोगी पडत नाहीं म्हणून त्या ठिकाणीं खोदून ती

जागा पोकळ करणें बरें नसतें. जुनें घर जेथें असेल ती सगळी जागा साफ केल्यानंतर कोठें साधारण पोकळ जागा असेल तर ती सुद्धां चांगली भरून काढून त्या ठिकाणीं चांगली पिटाई केल्यानंतर मग त्या जागेवर नवीन घराचा पाया आंखणें बरें असतें. जुन्या घराचा टाकाऊ सामान मलमा म्हणून जो जितका तो जितक्या अंतरावर लांब टाकतां येईल तितक्या अंतरावर लांब टाकणें बरें असतें. कारण असा मलमाजवळ टाकल्यानें नवीन कामाला अडचण येऊन कधी कधीं टाकलेला सामान वरचेवर सरकवावा लागतो. असा मलमा फेकण्याकरितां कधीं कधीं फारच खर्च येऊन काम करणारे बरोबर काम करतात किंवा नाहीं हेंहि समजणें कठीण असल्यामुळें त्या कामाला लागणाऱ्या खर्चाचा अंदाज असावा म्हणून किती खर्च येतो हें हिशेबानें ठरविणें बरें असतें. मजुराला जी रोज मजुरी दिली जाते त्या दराला चार दशांशानें गुणिलें म्हणजे जो आंकडा येतो तितका खर्च १०० घन-फुट मलमा १०० फूट अंतरावर लांब टाकण्याकरितां आला तर तो खर्च वाजवी असतो. मजुराचा दर जर दहा आणे रोज आहे तर १०० घनफुट मलमा १०० फुट अंतरावर टाकण्यास १०×४÷१०=४ आणे खर्च वाजवी असतो. अशा रीतीनें हिशेब केला म्हणजे ६०० फूट अंतरावर मलमा फेकावयाचा झाल्यास त्याला खर्च चार गुणिलें सहा

ह्मणजे चोविस आणे खर्च येतो आणि हा खर्च शंभर घनं फूट मलमा फेकण्याकरितां असल्यामुळें चारशे घनफूट मलमा सहासे फूट अंतरावर फेकावयाचा झाल्यास त्याचा खर्च चोविसला चारनें गुणिलें म्हणजे जो आंकडा येतो तो खर्च ( २४×४=९६ आणे ) म्हणजे सहा रुपये वाजवी असतो. अशा प्रकारे खर्चाचा अंदाज केला म्हणजे व्यर्थ खर्च होण्याची भीति नसते. जुनें लांकूड काम जसें असेल तसेंच पुन्हां कामाला लावणें झाल्यास फक्त लावण्याची मजुरी लागते. परंतु त्याचा कांहीं भाग सडका झालेला असल्यास जो चांगला. असेल तेवढाच भाग कामाला उपयोगी पडणारा असल्यामुळें ते लांकूड ज्या मापाप्रमाणें उपयोगी पडेल त्या मापाप्रमाणें कापावें लागतें. म्हणजे जुन्या घराच्या मयाली दाराच्या चौकटी करितांहि उपयोगी पडतात. इतर जुना सामान काम संपेतोंपर्यंत ठेवावा लागतो. कारण कशाचा उपयोग केव्हां पडतो ह्याचा नेम नसतो.

पाया खोदाई:—घराचा पाया खोदतांना जी माती निघते ती खोदलेल्या जागेपासून पांच फूट अंतरावर तरी टाकणें बरें असतें. काळी माती असल्यास जितका पाया खोल असेल त्या खोली इतक्याच अंतरावर ती माती टाकावी लागते. म्हणजे पाया जर दहा फूट खोल न्यावयाचा असेल तर दहा फुटाच्या अंतरावरच

पायांतील माती टाकावी लागते. पाया खोदतांना कठीण जमीन लागली ह्मणजे त्याठिकाणीं कठीण जमीनींत एक फूट पाया खोदल्यानें पुरेसा असतो. सगळ्या घराच्या सर्व भिंतीला सारखाच खोल पाया असला पाहिजे असें नसून ज्याप्रमाणें खालीं जमीन लागेल त्याप्रमाणें पाया खोल न्यावा लागतो. ह्मणून चाळीस फूट लांब असलेल्या भिंतीचा पाया दहाफूट लांब पर्यंत पांच फूट खोल असला आणि एका बाजूनें पंधरा फूट लांबपर्यंत सहाफूट पाया खोल असून दुसऱ्या बाजूनें चारफूट पाया खोल असला तरी त्याला हरकत नसते. पाया किती खोल आहे याला महत्व नसून पाया कोणत्या प्रकारच्या जमीनीवर आहे ह्याला महत्व असल्यामुळें कठीण जमीन लागल्यानंतर त्याठिकाणीं ज्यास्त खोल पाया नेणें व्यर्थ असल्यामुळें एकाच भिंतीला ज्यास्त आणि कमी खोल असलेली पायरी वजा पाया चालतो. उतार जागा असली ह्मणजे आवाराची सिमा दाखविणारी भिंतहि पायरीव- जाच बांधावी लागते आणि त्याला पायाहि पायरीवजाच ठेवावा लागतो. अशारीतीनें भिंतीच्या कामांत टप्पे असतात. काळ्या मातींत जितका पाया असतो त्याठिकाणीं भिंतीच्या दोन्ही बाजूनें दोन फुट ज्यास्त पाया खणून त्या जागेंत रेति भर- ल्यानें भिंतीला कमी भीति असते. कारण काळ्या मातींत पाणी मुरलें ह्मणजे त्याठिकाणीं भेगा पडून भिंतीला जो

धक्का असतो तो बाजूला रेति भरल्यानें टळतो म्हणून अशा ठिणाणीं रेति भरणें बरें असतें. अशा ठिकाणीं घराच्या बाहेरील बाजूनें दाहाफुट रुंद मुरूमाचा सहा इंचाचा भराव टाकल्यानेंहि बराच फायदा होऊन काळ्यामातीपासून नुकसान होण्याचें बऱ्याच अंशानें टळते.

चुनाः— खाणीत मिळणारा चुन्याचा दगड अथवा शेतांत सांपडणारी चुनखडी चुन्याकरितां उपयोगी असते. चुनखडी भाजण्याच्या अगोदर तिला लागलेली माती साफ करावी लागते. चुनखडी भट्टीत भाजल्यानंतर तिला ओलावा न लागेल अशा ठिकाणीं ठेवणें जरूरीचें असते आणि पंधरा दिवसाच्या आंत तिला उपयोगांत आणावी लागते. भाजलेल्या चुनखडीवर पाणि टाकून तिला फूलवून तिचा जेव्हां चुना तयार होतो तो चार दिवसाचे आंत उपयोगांत आणणें चांगलें असतें. चुना एका चौरस इंचास चौसष्ट छिद्रे असलेल्या चाळणीतून छाणावा लागतो. ओलाव्यामुळें जर चुना खराब झाला तर तो उपयोगांत आणणें नुकसानीचे असतें म्हणून चुना फारच सांभाळून ठेवावा लागतो. खराब चुना वापरून काम खराब करून घेण्यापेक्षां विटाचे जुडाई काम तरी मातीत करणें बरें असतें. तरी पण इतर ठिकाणीं

चुना वापरणें जरूरीचें असल्यामुळें चुन्या संबंधानें जर काळजी न घेतली तर केलेलें काम खराब होऊन तेंच काम पुन्हः पुन्हः करविल्यानें ज्यास्त खर्चाचें होऊन जातें आणि कामहि जसें झालें पाहिजे तसें शेवटीं चांगलें होत नाहीं. म्हणून चुन्या संबंधानें सावधगिरी ठेवावी लागते.

सुरखीः—कमी भाजले गेलेल्या विटाची अथवा पिवळ्यारंगाच्या विटाची कुटून अथवा पिसून भुकटी केली म्हणजे ती सुरखी चुन्यांत मिसळण्याकरितां चांगली असते. ताज्या विटाची सुरखी चांगली असते. जुन्या विटा अथवा विटाचे तुकडे सुरखी करितां चांगले नसतात. म्हणून जुन्या विटा आणि त्यांतल्या त्यांत जुन्या घरांतून निघालेल्या विटा तर सुरखी करितां चांगल्या नसतात म्हणून तशा विटा सुरखी करितां उपयोगांत न येतील असा बंदोबस्त ठेवावा लागतो.

रेतिः—नदी अथवा नाल्यांतील रेति चांगली धुवून घेतली म्हणजे त्यांत असलेली माति नाहींशी होते. अशी शुद्ध रेति उपयोगांत आणणें बरें असतें.

पिसलेला चुनाः—मागील लेखांत सांगितल्या॰ प्रमाणें पिसलेला चुना कामाला लागतो. वाफेच्या जोरावर चालणाऱ्या चक्कीतहि चुना पिसलां जातो. दगडाच्या चक्कींत पांच तास पिसलेला चुना आणि वाफेच्या जोरा-

वर चालणाऱ्या चक्कींत वीस मिनीटे पिसलेला चुना कामाला लागतो. पिसलेला चुना चोवीस तासाच्या आंत कामाला लावणें बरें असते आणि वाळून खराब होऊं नये ह्मणून थंड ठिकाणीं छायेखालीं चुना ठेवणें बरें असते आणि चुन्याची कुंडी करून त्यांत पाणि टाकून ठेवल्यानें चुना चांगला राहतो. कोणत्याहि कामाला लावण्याचे अगोदर कुंडीतला चुना चांगला मिसळून घ्यावा लागतो. पिसलेला चुना जर कांहीं हयगय झाल्यामुळें वाळून गेला तर त्यांत पाणि टाकून पुन्हां ओला करणें बरें नसतें. म्हणूंन तो वाळून जाणार नाहीं असाच बंदोबस्त ठेवावा लागतो. वाळून गेलेला चुना पुन्हां चक्कींत टाकून पिसल्यानें हलक्या कामांत उपयोगी पडत असल्यामुळें एका बाजूस ठेवणें बरें असतें परंतु तो चुना चांगल्याकामांत उपयोगांत येणार नाहीं असा बंदोबस्त ठेवणें जरूरीचें असतें. कारण चुन्याचें कामांत बरीच गडबड होते आणि ठेकेदारी काम असलें तर चुना फुकट जाऊं नये ह्मणून काम चांगलें होईल किंवा वाईट होईल ह्याची त्यांना काळजी नसल्यामुळें असा चुना ते काम करीत असताना चांगल्या कामांतहि उपयोगांत आणल्याशिवाय राहत नाहींत म्हणून तसें न व्हावें ह्या हेतूनें त्या चुन्याला कामासून दुर फेकून द्यावा लागतो.

सिमिंटः--सिमिंटांत काम करावयाचें असल्यास सिमिंट आणि रेति कोरडी असतांनाच चांगली मिसळून घ्यावी लागते आणि मिसळल्यानंतर त्यांत पाणि मिसळावें लागतें. छपाईच्या कामाकरितां एक भाग सिमिंट आणि दोन भाग रेति असें प्रमाण असतें. मिसळलेल्या सिमिंटांत पाणि टाकल्यानंतर लागलीच उपयोगांत आणणें बरें असतें. फार झालें तर अर्धातासाचें आंत सिमिंट उपयोगांत आणावाच लागतो. कांक्रीटच्या कामांत एक भाग सिमिंट आणि तीन भाग रेति करितां सहाभाग गिट्टीचें प्रमाण असतें. आणि सिमिंट, रेति आणि गिट्टी कोरडी असतानाच मिसळवावी लागतें. एकाच वेळेला पन्नास घनफूट गिट्टीपेक्षां ज्यास्त गिट्टी उपयोगांत अणणें बरें नसतें. हें मिश्रण ज्या ठिकाणीं करावयाचें असते त्या ठिकाणीं दगडांनीं किंवा विटांनीं जागा पक्की केली ह्मणजे त्या मिश्रणांत जमिनीवरील माति जाण्याचा संभव नसतो. कारण त्या मिश्रणाकरितां जागा चांगली पक्की लागते. ह्या मिश्रणांत पाणि टाकल्यानंतर तीन तासापेक्षां जास्त तासांनीं उपयोगांत आणावयाचें असेल तर त्या मिश्रणांत सिमिंट टाकण्याचें अगोदर रेति आणि गिट्टी कोरडी आहे ह्याबद्दल खात्री करून घ्यावी लागते. कारण त्यांत जरी थोडा ओलावा असला तरी सिमिंटला

ओलावा पोंहचून मिश्रण तीन तासापेक्षां ज्यास्त वेळ लागल्यास ते मिश्रण कामाला निरुपयोगी ठरतें. म्हणूच फारच सावधगिरी ठेवावी लागते. कारण काळजी पूर्वक जर काम न झालें तर माल मसाला जो लागावयाचा तो लागून आणि पैसा खर्च होऊनहि इयगयीमुळें खराब काम हातीं लागतें आणि असें प्रकार बहुतेक ठिकाणीं होतात म्हणूनच खराब कामेंहि झालेली दृष्टोत्पतीस पड- सात. म्हणून अशी कामें काळजीपूर्वक करणें आवश्यक असतें. कामाकरितां जो सिमिंट लागतो तो खात्रीचा पोर्टल्यांड सिमिंट आणावा लागतो.

दगडाचें आणि विटांचें जुडाईकाम:—जुडाई काम दोरी सूत आणि ओळंब्यांत करावें लागतें. दगड आणि विटा कामांत लावण्याच्या अगोदर पाण्यांत भिजवून घ्याव्या लागतात. जुडाई कामावर पाणि टाकावयाचें असते तें टिनाच्या हजाऱ्यानें टाकणें बरें असतें कारण हजाऱ्यानें पाणि टाकिलें म्हणजे चुना निघून जात नाहीं. कांहीं ठिकाणीं मडक्यानें पाणी ओततात अथवा टिनपाटानें पाणी फेंकतात परंतु तसें करणें बरें नसून त्या योगानें चुन्याच्या कामाला मजबुती न येतां उलट चुना निघून जात असल्यामुळें काम खराब होऊन जातें. म्हणून पिसलेल्या चुन्यांतून चुना निघून धुतला जाणार नाहीं अशाच रीतीनें पाणी कामावर टाकिलें म्हणजे तें काम मजबुत होतें.

जुडाई कामावर कमीत कमी सात दिवस तरी पाणी टाकावें लागतें. जुडाई काम एकदम फारच उंच न करितां दोन तें तीन फुट उंचीचें चोहों बाजूनें सारखे उंच झाल्यानंतर मग दुसऱ्या थराचें काम सुरू करणें बरें असतें. कांहीं कारणामुळें सर्वकाम सारखें उंच उठवितां जर आलें नाहीं तर झालेल्या भिंतींत टप्पा ठेवावा त्या तो ह्मणजेच जोड मिळतो आणि असे टप्पे ठेवण्याचे प्रसंग आडव्या भिंतीचें काम मागें राहिल्यास नेहमीं येतात. जुडाई काम चाललें असतांना लांकडी काम आणि लोखंडी काम जुडाई बरोबरच करावें लागतें. कारण मागाहून तसें काम भिंतींत बसवितांना केलेली जुडाई फोडणें बरें नसतें. दगडाची जुडाई करतांना दगड जे उपयोगांत आणावे लागतात ते चांगले दगड असणें बरें असतें. खदांनीतुन जसे दगड निघतात या थराप्रमाणेंच दगड उपयोगांत आणणें बरें असतें. छपाई जर करावयाची असेल तर दरजेतील चुना पक्का होण्याच्या अगोदरच उकरून ठेवावा लागतो. जुनें आणि नवें जुडाई काम जोडावयाचें असतें तेव्हां नवें काम करण्याचे अगोदर दोन दिवसापासून जुन्या कामावर पाणी टाकून जुन्या कामाला ओलावा आणणें जरूरीचें असतें. जुडाई काम करतांना जोड मारणें फारच जरूरीचें असतें. कारण जोडावर जर जोड आला तर त्याठिकाणीं अशक्त भिंती असतें. जुडाईचा थर एक फूटापेक्षां

कमी ठेवणें बरें नसतें. दगडाचें कामः—दगडाची जेवढी उंची असेल त्याच्या दुप्पट त्यांची लांबी असावी लागते आणि रुंदी उंचीपेक्षां कमी असणें बरें नसतें. जोड पाव इंच असणें बरें असतें. जितके दगड लागतील त्यांच्या एक पंचमांश दगड भिंतींत पूर्ण जातील असें लांब असणें जरूरीचें असतें आणि असे दगड पांच फूट अंतरावर बसविणें बरें असतें. दगडाचें जुडाई काम ज्या भिंतींत करावयाचें असेल ती भिंत दीडफुटापेक्षां कमी असणें बरें नसतें.

विटाचें जुडाई कामः— पहिल्या नंबरच्या कामाकरितां टेबलमोल्डेड विटा लागतात. ह्या विटा सारख्या रंगाच्या आणि एकाच आकाराच्या असतात. त्या चांगल्या भाजल्या गेलेल्या असून त्याचा रंग लाल अथवा तांब्याच्या रंगासारख्या असतो. विटांचें माप ९ इंच × ४॥ इंच×२॥। इंच असतें. त्यांचा आकार दोरी सूत चौरस असून आवाज खणकर असतो. विटा पाण्यांत बारा तास भिजत टाकल्या तर त्यांचें वजन एक सोळांश ज्यास्त वाढतें.

दुसऱ्या नंबरच्या विटाच्या कामाकरितां वरील प्रमाणेंच विटा लागतात. परंतु त्यांचा रंग एकसारखा नसतो.

बाजारू विटा जमीनीवर सांच्यांत थापलेल्या असतात. त्यांचें माप ८ इंच × ४ इंच × १॥। इंच असतें. कमी मापाच्याहि विटा असतात. विटा कामाला लागणाऱ्या

अगोदर तीन तास तरी पाण्यांत भिजलेल्या असाव्या लाग- सात. विटांच्या जुडाईंत चुना चांगला भरावा लागतो आणि कोठें पोकळ राहणार नाहीं ह्याची काळजी घ्यावी लागते. खालच्या आणि वरच्या थराचे जोड मारावे लागतात. जोड मारण्याकरितांच पूर्ण विटांच्या तुकड्याचा उपयोग करावा लागतो. रोजचे काम संपलें ह्मणजे त्या थरावर चुना पसरवून ठेवणें बरें असतें. कामावर टाकलेलें पाणी भिंतीवर राहावें ह्मणून किनाऱ्यानें चुन्याची कोर बांधिली ह्मणजे पाणी त्याठिकाणीं राहून जिरतें. दुसरा थर लावते वेळीं कोरीला चुना असेल तो खरडून काढावा लागतो.

विटांचें मातींत काम करावयाचें झाल्यास विटा पाण्यांत भिजविण्याची जरूरी नसते. लांकूड कामाचा जेथें संबंध येतो त्या ठिकाणीं बाजुची जुडाई चुन्यांत एक फुट तरी असणें बरें असतें.कारण त्यायोगें मातीमुळें लांकूड काम सडण्याचा जो संभव असतो तो टळतो. तरी पण चुन्याच्या जुडाईचा जरी संबंध असला तरी त्या ठिकाणींहि लांकूड कामाला डामर लावणें जरूरीचेंच असतें. जागा कमी असल्यास आणि पडद्या करावयाच्या असल्यास साडेचार इंचाची जाड पडदी विटांत करतां येते. परंतु त्याठिकाणीं लांकूड कामाचा सांचा करून त्यांत विटा फसवाव्या लागतात. कधीं कधीं अशा ठिकाणीं जाळीचें लांकूड काम करून त्यावर चुना छापल्यानें पडदी करतां येतें. लांकडी जाळी

न करतां बांबाच्या कामट्यांची जाळी विणून त्यावर दोन्ही बाजूनें चुना छापल्यानेंहि पडदी करतां येते. लोखंडी जाळीच्या पडद्या मजबूत असतात.

**चुन्याची छपाई:—** विटांच्या कामावर छपाईचें काम एका हातानेच करावें लागतें. चुन्याची छपाई झाल्यावर त्यावर सनला घोटावा लागतो. सनल्याकरितां तीन भाग चुन्याला एक भाग रेति पुरेशी असते. चुन्याच्या छपाईवर पाण्याचा मारा चांगला करावा लागतो. सनला घोटल्यानंतर छपाई मजबूत करण्याकरितां जे मिश्रण सिंपडावें लागतें तें मिश्रण तीस ग्यालन पाण्यांत साडेतीन शेर गुळ आणि दोन शेर बेलफल टाकल्यानें तयार होतें.

**सफेदी:—** एक घन फूट चुन्याला चार औंस गोंद टाकल्यानें सफेदी चांगली होतें आणि कांहीं दिवस टिकते.

**गच्ची:—** गच्ची फुटल्यास त्या ठिकाणीं भेगा साफ करून त्यांत एक भाग राळ, एक भाग जवसाचें तेल आणि एक भाग सुरखी ह्यांचें उकळलेलें मिश्रण टाकल्यानें गळणें बंद होतें. वरील मिश्रण तयार करतांना तेल आणि राळ प्रथम चांगले उकळल्या नंतर त्यांत सुरखी मिसळावी लागते, सुरखी नसल्यास चांगली स्वच्छ रेति टाकल्यानेंहि काम चालतें. गच्चं फारच फुटली असल्यास सिमेंटचा हात घोटल्यानेंहि गळणें तात्पुरतें बंद होतें.

अशा प्रकारें गृहाची कामें करीत असतांना बऱ्याच प्रकारांची माहिती असणें जरूरीचें असतें. परंतु सगळ्या प्रकारांची सर्व प्रकारें असलेली माहिती ग्रंथ विस्तार भयास्तवच नव्हें तर इतर कांहीं अपरिहार्य कारणामुळें आतांतरी देतां येणें शक्य नसल्यामुळें सध्या पुरतें एवढेंच सांगून ज्या श्री नर्मदा माईच्या कृपेनें विचारास वळण लागलें आणि लेख लिहिण्याची स्फूर्ति झाली त्या जागृत देवीला नमन करून "हर नर्मदे हर, हर, महादेव" म्हणून श्री सच्चिदानंद महाराज वडगांवकर ह्यांच्या' प्रेरणाज्ञेनें हा दहावा लेख श्री शिवार्पण करण्याची परवानगी घेतों.


गतवर्षीं वर्षारंभीं 'गृह आणि गृहस्थ' ह्याविषयावर लेख लिहिल्यानंतर सबंधवर्षांत जितके भीतीदायकप्रसंग आले त्या सर्व प्रसंगीं शेवटीं भवभयच हरण होऊन भवसंदेह फिटल्या बरोबर जगाच्या वाढीस कारण असणाऱ्या अशा गृहांची जाणीव होऊन गृहांची काळजी घेणाऱ्या गृहस्थांनाच महत्व आलेलें दिसलें इतकेंच नव्हें तर ज्यायोगें जगाची इतर प्रकारेंहि वाढ होईल अशी निरानिराळ्या प्रकारचीं कामें करून पैपत वाढवीत असतांना त्यांच्या कडून

स्वार्थ त्यागहि होतांनाच दृष्टोत्पत्तीस पडला आणि पुढें होणारे गृहस्थ प्रथम ज्या आश्रमांत असतात त्या आश्रमांतहि असणाऱ्या विद्यार्थ्यांकडे त्यांचें लक्ष गेल्यामुळें विद्यार्थीहि आपल्याच आश्रमानुरूप असलेलें कर्म करण्याकडे वळलेले दिसलें आणि अशा प्रकारें चोहों बाजूनें जगाचीच वाढ करण्याकडे जगांत वावरणाऱ्यांची प्रवृत्ति झालेली दिसली तसेंच नवें वर्ष बंधु भगिनींना मुलाबाळांना आणि सर्वत्र मंडळींना सुखाचें जाऊन त्यांचा भवसंदेह फिटत जावो! आणि ज्या आश्रमांत असतांना गृहांची वाढ करतां येते आणि गृहांना सांभाळण्याची शक्ति असते त्या गृहस्थाश्रमाला योग्य असें वर्तन घडून आणि त्यांच्या कडून होणारीं कर्मे जगाच्या वाढीस कारण होऊन जगांत श्रीमंतीची वाढ होवो! अशी मागील वर्षाप्रमाणेंच यंदाहि वत्सरारंभाच्याच सुमुहूर्तावर ध्वजारोपण प्रसंगीं ईश्वराची निरंतर प्रार्थना करणारा आणि ईश्वर स्वरूपी असलेल्या तुज्ञ मंडळीपुढें हा लेख नम्रपणें सादर करणारा,

आपला कृपाभिलाषी,

गोविंद [illegible] अळेकर.

घराचा नक्षा.


चौचकुप
४X४
५X५
८X५
८X५
२०½X१५
मोकळेंआगार
६
९X८
७X५
५X५
जिना
१२X१०
१२X१०
३½
कोठरी
७X७½
३२ फूट लांब

REFBK-0002706

पुस्तक नागपूर शहर बेनिागिरवाडा सर्कल नं. ७ येथें
वि. म. कुळकर्णी, बी. एस्. सी. यांनीं स्वातंत्र्य
छापखान्यांत छापिलें.